# वंचितच्या गोटात खलबते!



दैनिक बीड
पुण्यभूमी
संपादकः बाळासाहेब मस्के



## आता माजलगावमध्ये शेख मंजूर ऐवजी बाबरी मुंडे येण्याचे संकेत

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी
जिल्ह्यात सहा विधानसभा मतदार संघात निवडणूक रणधुमाळी सुरु आहे.त्या अनुषंगाने माजलगाव मतदार संघात, राष्ट्रवादीकडून नगर अध्यक्ष राहिलेले शेख मंजूर यांना वंचितकडून उमेदवारी घोषित करण्यात आली आहे. राष्ट्रवादीचे उंबरठे झिजवूनही शेख मंजूर यांना उमेदवारीपासून डावलण्यात आले होते. त्यामुळे निवडणूकीत शेवटी पक्षाचे लेबल महत्वाचे असल्याने शेख मंजूर वंचितकडे गेले आहेत. मात्र विश्वसनिय सूत्रांच्या माहितीनुसार माजलगाव मतदार संघात शेख मंजूर यांच्या ऐवजी भाजपचे समर्थक, बाबरी मुंडे यांना वंचितकडून पक्षाचा एबी फॉर्म मिळणार असल्याचे संकेत आहेत. त्यामुळे शेख मंजूर पून्हा वंचित राहतात की काय?असा प्रश्न निर्माण झाला आहे?

### ओपन विरुद्ध ओबीसी मतांची विभागणी म्हणून निर्णय का?

### राष्ट्रवादीचे उंबरठे झिजविणारे मंजूर पुन्हा नामंजूर होणार का?

### लोक वंचितमध्ये येतात आणि निवडणुका झाल्या की निघून जातात?

### वंचित एकनिष्ठतेचा विचार करत नाही राज्यातील कार्यकर्त्यांची चर्चा

राज्यात, विधानसभा निवडणूकीचे वातावरण चांगलेच तापले आहे.त्या अनुषंगाने यंदाच्या निवडणूकीत बीडच्या सहाही मतदार संघाचे चित्र पूर्णपणे वेगळे असणार आहे.अनेक नाराज गट, इकडून तिकडे आणि तिकडून इकडे प्रवेश करताना दिसून येत आहेत. त्यामुळे उमेदवारी अर्ज माघार घेण्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत अनेख खलबते आणि हेवेदावे उघड होतील असेच चित्र आहे. राज्याच्या राजकारणात वंचित बहुजन आघाडीकडून उमेदवारी याद्या जाहीर झाल्या,त्यामुध्ये मुस्लिम समाजाला प्राधान्याने प्रतिनिधित्व दिल्याचे पाहायला मिळाले.त्या यादीत शेख मंजूर यांचाही नंबर लागला. परंतू जोपर्यंत पक्षाचा एबी फॉर्म मिळत नाही, तोपर्यंत उमेदवार निश्चित मानला जात नाही. त्यामुळे अजून बऱ्याच अंधारातल्या गोष्टी उजेडात येणार आहेत.

माजलगाव मतदार संघात सोळंके कुटुंबाचे राजकारण दीर्घकाळ टिकून आहे. महायुतीकडून राष्ट्रवादी अजित पवार गटाचे अधिकृत उमेदवार प्रकाश सोळंके जाहीर झाले आहेत. गेल्या दोन दिवसांपूर्वी प्रकाश सोळंके यांचे पुतणे जयसिंग सोळंके यांच्या नावाची चर्चा होती. मात्र

बी.एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

### बाबरी मुंडे ठाम...

माजलगाव मतदार संघात आपल्याला भाजपकडून उमेदवारी मिळाली नाही तर आपण अपक्ष म्हणून ही निवडणूक लढविणार आहोत. या भूमिकेवर पंकजा मुंडे यांचे खंदे समर्थक बाबरी मुंडे ठाम होते. त्या अनुषंगाने त्यांनी माजलगाव मतदार संघात प्रचार संवाद दौरे कधीच सुरू केले होते. आपला उमेदवारी अर्ज दाखल करून निवडणुकीवर खरोखरच ठाम असल्याचे त्यांनी दाखवून दिले असले तरी उमेदवारी अर्ज माघार घेण्याच्या शेवटापर्यंत हा निर्णय ठाम राहतो की नाही हा देखील प्रश्न आहे. त्यांना वंचित कडून उमेदवारी दिली तर निश्चितच प्रबळ ठरतील अशा चर्चा आहेत.

### नाराज झालेले शेख मंजूर आले खरे...

राष्ट्रवादीकडून तिकीट न मिळाल्याने नाराज असलेले शेख मंजूर वंचितकडे आले खरे परंतु ते किती काळ वंचितमध्ये टिकून राहतील हा एक प्रश्न आहे. कारण वंचितच्या राजकारणात आजपर्यंत असेच दिसून येते. निवडणुका आल्या की लोक वंचितकडे येऊन निवडणूक लढवितात आपला फायदा करून घेतात आणि त्यानंतर वंचितला सोडचिठ्ठी देतात. त्यामुळे वंचितमध्ये असलेल्या एकनिष्ठ कार्यकर्त्यांना न्याय मिळत नाही म्हणून पक्ष मानवा तेवढा परिपक्व आणि निर्णायक टप्प्यावर जाताना दिसून येत नाही.

## आष्टीत महेबूब शेख यांचे जोरदार स्वागत

राजकीय:आष्टी मतदार संघातून शेख यांनी फुंकली तुतारी



कडा/पुण्यभूमी प्रतिनिधी
मागील अनेक दिवसांपासून आष्टी विधानसभा मतदारसंघात तुतारीची उमेदवारी कुणाला मिळणार याविषयी राजकीय वर्तुळात संभ्रम निर्माण झाला होता. मात्र महाविकास आघाडीचे सर्व इच्छुक उमेदवार मुंबईत ठाण मांडून होते. मात्र आघाडीकडून बहुचर्चित आष्टी विधानसभा मतदार संघातून महेबुब शेख यांना अखेर तुतारी फुंकण्याची संधी मिळाली. उमेदवारी मिळाल्यानंतर कड्यासह आष्टी शहरात महेबूब शेख यांचे नागरीकांकडून पुष्पवृष्टी करुन जोरदार स्वागत करण्यात आले.

आष्टी विधानसभा मतदारसंघात ठिकठीकाणी महेबुब शेख यांचे जोरदार स्वागत करण्यात आले. कड्यासह आष्टी जय जिजाऊ जय शिवरायचा जयघोष करुन, तुमच आमचं नातं काय जय शिवराय, जय जिजाऊ अशी शेख यांनी जोरदार घोषणाबाजी करत ढोल ताशांच्या गजरात जेसीबीतुन पुष्पवृष्टी करत जल्लोषात महेबुब शेख यांचे स्वागत करण्यात आले. कड्यात छत्रपती शिवाजी महाराजांसह भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन शेख यांनी पान २ वर...

## महाराष्ट्रातल्या नेत्यांवर गांधी नाराज?

चर्चेतले:फॉर्म्युला ठरला मात्र नाराजीचा सूर

दिल्ली/पुण्यभूमी प्रतिनिधी
महाराष्ट्रात महाविकास आघाडीचा ८५-८५-८५ असा फॉर्म्युला ठरला आहे. मात्र या फॉर्म्युल्यावर राहुल गांधी नाराज असल्याची चर्चा रंगली होती. काँग्रेसची बैठक काही वेळापूर्वी दिल्लीत पार पडली. यानंतर महाराष्ट्र निवडणूक प्रभारी रमेश चेन्निथला यांनी आमची दुसरी यादी लवकरच येईल असं सांगितलं. तर महाराष्ट्र काँग्रेसचे प्रदेश अध्यक्ष नाना पटोले यांना राहुल गांधी



जागावाटपाच्या फॉर्म्युलावर नाराज आहेत का? असं विचारलं तेव्हा त्यांनी याबाबत पान २ वर...

## महाविकास आघाडीत पहिली ठिणगी?

चर्चा:पक्ष वेगळा निर्णय घेण्याच्या तयारीत



मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी
महाविकास आघाडीत बिघाडी होणार की काय? असा प्रश्न राजकीय वर्तुळात उपस्थित होतो आहे. याचं कारणही तसंच आहे. महाविकास आघाडीतला एक पक्ष बंड पुकारण्याच्या तयारीत आहे. महाविकास आघाडीने ८५-८५-८५ असा फॉर्म्युला जाहीर केला. दोन दिवसांपूर्वी जयंत पाटील (राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष), संजय राऊत (शिवसेना उद्धव ठाकरे पक्ष), नाना पटोले, काँग्रेस या तीन पक्षांनी हा फॉर्म्युला जाहीर केला. तसंच २७० जागांवर आमचं एकमत झाल्याचंही म्हटलं होतं. उर्वरित १८ जागा आम्ही मित्रपक्षांना देऊ असंही सांगितलं होतं. त्यानंतर आता महाविकास आघाडीतला एक पक्ष बंड पुकारण्याच्या तयारीत आहे.महाविकास आघाडीच्या तीन राजकीय पक्षांची बैठक शरद पवार यांच्यासमोर झाली. ८५-८५-८५ या जागांवर पान २ वर...

## ओमप्रकाश बुरांडेंवर शुभेच्छांचा वर्षाव

परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी
दै.मराठवाडा साथीचे कार्यकारी संपादक तथा ज्येष्ठ पत्रकार ओमप्रकाशजी बुरांडे यांचा वाढदिवस दै.मराठवाडा साथी कार्यालयात साजरा करण्यात आला. यावेळी शहरातील विविध वृत्तपत्रांचे संपादक, पत्रकार, राजकीय पदाधिकारी, समाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. दै.मराठवाडा साथीचे कार्यकारी संपादक तथा ज्येष्ठ पत्रकार ओमप्रकाशजी बुरांडे यांचा वाढदिवस



दै.मराठवाडा साथी कार्यालयात साजरा करण्यात आला. आज दिवसभरात ओमप्रकाश बुरांडे यांना वाढदिवसानिमित्त शहरातील विविध पक्षाचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते पान २ वर...

पडघम | राजेभाऊ फड सोमवारी करणार उमेदवारी दाखल

## महाविकास आघाडीकडून करणार अर्ज दाखल!

परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी
राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष तसेच महाविकास आघाडीच्या वतीने राजेभाऊ श्रीराम फड हे सोमवार दिनांक २८ रोजी आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. २३३ परळी विधानसभा मतदारसंघातून त्यांना महाविकास आघाडीकडून उमेदवारी जाहीर होण्याचे संकेत आहेत. मोठ्या ताकदीने ते या निवडणुकीला सामोरे जात आहेत. मागील काळातील त्यांनी केलेले सामाजिक कार्य, त्यांना असलेला राजकीय अनुभव आणि जनतेत असलेली त्यांची सकारात्मक ओळख लक्षात घेत पक्षाने त्यांच्यावर या निवडणुकीत उतरण्याची मोठी जबाबदारी टाकली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे सर्वेसर्वा शरदचंद्र पवार तसेच महाविकास आघाडीच्या सर्व प्रमुख नेत्यांच्या मार्गदर्शनाखाली परळी विधानसभा मतदारसंघातून राजेभाऊ



श्रीराम फड हे आपला उमेदवारी अर्ज येत्या सोमवारी दाखल करणार आहेत. परळी विधानसभा मतदारसंघातील सर्व प्रमुख नेत्यांची यावेळी उपस्थिती असणार आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे, काँग्रेस आणि मित्र पक्षाच्या वतीने राजेभाऊ फड विधानसभा निवडणुकीच्या रणमैदानात ताकदीने उतरत आहेत. सर्वसामान्य जनतेतून त्यांना मोठा पाठिंबा मिळताना दिसतोय. लोकांमधील त्यांची लोकप्रियता लक्षात घेता पक्षाने त्यांच्यावर ही निवडणूक लढवण्याची मोठी जबाबदारी टाकली आहे.


### पवारांच्या सोशल इंजीनियरिंगची जोरदार चर्चा

विधानसभा २०२४ च्या निवडणुकीत उमेदवारी देत असताना राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे सर्वेसर्वा शरदचंद्र पवार यांनी चांगलीच सोशल इंजीनियरिंग साधली आहे. राज्याचे माजी मंत्री जितेंद्र आव्हाड, प्रताप ढाकणे, राजेभाऊ फड यांच्यासह अनेकांना संधी देऊन शरदचंद्र पवार यांनी ओबीसी समाजाला मोठा न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे. बीड जिल्ह्यातील पाच जागांवर उमेदवार देऊन पक्ष निवडणुकीच्या रिंगणात उतरला आहे. यामध्ये मुस्लिम समाजाला न्याय देत आष्टी मतदार संघातून महेबुब भाई शेख, केजच्या राखीव जागेवर पृथ्वीराज साठे यांना दुसऱ्यांदा तर परळी विधानसभा मतदारसंघातून ओबीसी समाजाला न्याय देत राजेभाऊ फड यांना निवडणुकीच्या मैदानात शरद पवारांनी उतरवले आहे. पवारांच्या या सोशल इंजिनिअरिंगची सर्वत्र जोरदार चर्चा होत असून त्यांना मोठ्या प्रमाणावर सहानुभूती मिळताना दिसते आहे.

## कॅनडाने भारताच्या पाठीत खंजीर खुपसला

देशविदेश:भारताचे उच्चायुक्त संजय वर्मा यांचा आरोप

दिल्ली/पुण्यभूमी प्रतिनिधी
एक मैत्रीपूर्ण लोकशाही असलेल्या देशाने पाठीत खंजीर खुपसल्याचा गंभीर आरोप भारताचे उच्चायुक्त संजय वर्मा यांनी कॅनडाच्या वागणुकीवर आक्षेप घेताना केला. कॅनडाने अत्यंत अव्यावसायिक पद्धतीने वागवल्याचेही त्यांनी म्हटले आहे. 'पीटीआय'ला दिलेल्या मुलाखतीत ते बोलत होते.



भारतात परतल्यानंतर बुधवारी 'पीटीआय'शी विविध मुद्द्यांवर बोलताना वर्मा यांनी कॅनडातील खलिस्तानी चळवळीची उत्पत्ती, स्थानिक राजकारण्यांकडून निवडणुकीतील फायद्यासाठी मिळत असलेला पाठिंबा आदींविषयी सांगितले. खलिस्तानी आपली संख्या वाढवण्यासाठी गुन्हेगारी कारवाया करतात, असा आरोपही त्यांनी केला.भारतीय तंत्रज्ञान संस्थेचे पदवीधर आणि अणुशास्त्रज्ञ असलेले वर्मा यांनी यापूर्वी जपान आणि सुदानमध्ये भारताचे राजदूत म्हणून काम केले आहे. दोन देशांमधील संबंध बिघडल्यानंतर कॅनडाने १३ ऑक्टोबर रोजी वर्मा यांना भारताने खलिस्तानी दहशतवादी म्हणून घोषित केलेल्या हरदीप सिंग निज्जर या कॅनेडियन नागरिकाच्या हत्येत स्वारस्य असल्याचा आरोप केला होता. कॅनडाने पुढील कारवाई करण्यापूर्वी भारताने वर्मा आणि इतर पाच मुत्सद्दींना परत बोलावले.दरम्यान, खलिस्तानच्या मूठभर समर्थकांनी कॅनडातील विचारधारेला गुन्हेगारीत रूपांतरित पान २ वर...

## भारत–चीनमध्ये गस्त करार

भारत आणि चीनमध्ये गेल्या काही वर्षांपासून सुरू असलेला सीमावाद आता अखेर संपुष्टात आला आहे. चीनने भारताशी 'गस्त करार' करण्यास सहमती दर्शवली आहे. या गस्त करारानंतर सीमेवर दोन्ही देशांमध्ये पुन्हा एकदा विश्वासाचे वातावरण निर्माण होण्यास मदत होणार आहे. एवढेच नव्हे तर या करारावर मंगळवारी दोन्ही देशांनी स्वाक्षऱ्या केल्या आहेत, असे सांगण्यात येते. भारत आणि चीनमध्ये सैन्य मागे घेण्याबाबत आणि प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवर (एलएसी) गस्त घालण्याबाबतचा हा करार आहे. यामुळे २०२०पासून सुरू झालेला भारत–चीन सीमावाद संपण्यास मदत होणार आहे. या करारामुळे डेपसांग आणि डेमचोकमध्ये दोन्ही देशांची गस्त सुरू होईल. प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवर २०२० पूर्वीप्रमाणे शांतता प्रस्थापित होईल. दोन्ही देशांचे सैन्य भारत–चीन सीमेवरून माघार घेतील आणि एलएसीवरून २०२० साली सुरू झालेला वाद संपुष्टात येईल, अशी अपेक्षा दोन्ही देशांकडून व्यक्त केली जात आहे.१६ व्या ब्रिक्स परिषदेसाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी हे रशिया दौऱ्यासाठी रवाना झाले आहेत. रशिया आणि चीनचे संबंध खूप चांगले असल्यामुळे चीन आणि भारत यांच्यातील तणाव कमी करण्यासाठी रशियाचे अध्यक्ष पुतिन यांनी महत्त्वाची भूमिका बजाविण्याचे त्याच्या एकूण परराष्ट्रविषयक धोरणावरून दिसून येत आहे. त्यातून अनेक चांगल्या बाबी घडून येताना दिसत आहेत. मात्र, भारत आणि चीन यांच्यातील तणावपूर्ण स्थिती ही अलीकडची बाब नाही. दोन्ही देशांमधील सीमेवरील तणाव आणि युद्धाच्या पार्श्वभूमीला तसा खूप जुना इतिहास आहे. १९६२ चे भारत–चीन युद्ध हे आज इतिहासातील पुस्तकाचा विषय नाही, तर भारतीय आणि चीनमधील नागरिकांमध्ये या युद्धानंतर विश्वासाचे नाते निर्माण झाले नव्हते. २०२०मध्ये पूर्व लडाखमध्ये भारतीय आणि चिनी सैनिकांमध्ये हिंसक संघर्ष झाला होता, हा अलीकडचा प्रसंग. ज्यात २० भारतीय जवान शहीद झाले होते, तर अनेक चिनी सैनिकांचाही यात मृत्यू झाला होता. तेव्हापासून दोन्ही देशांमध्ये तणावपूर्ण स्थिती आहे. मात्र दोन्ही देशांतर्गत असलेल्या व्यापाराला त्याची झळ पोहोचली होती. २०२३पर्यंत दोन्ही देशांमधील द्विपक्षीय व्यापार १३६ अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचला होता. चीन आणि भारताच्या परराष्ट्र मंत्र्यांची सीमावर्ती भागातील प्रश्नांवर गेल्या काही महिन्यांपासून बैठकांचा सिलसिला सुरू होता, पण त्यात समाधानकारक मार्ग निघू शकला नव्हता, ही वस्तुस्थिती मान्य करायला हवी. परराष्ट्र मंत्रालयाच्या अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, इथपर्यंत पोहोचणे ही मोठी गोष्ट नव्हती आणि ती इतक्या सहजासहजी घडलेली नाही. जुलै २०२४ मध्ये परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर आणि चीनचे परराष्ट्र मंत्री वांग यी यांच्यात दोन महत्त्वाच्या बैठका झाल्या होत्या. गेल्या चार वर्षांत राजनैतिक बैठकांच्या ३१ फेऱ्या आणि लष्करी चर्चेच्या २१ फेऱ्यांमुळे प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवरून सैन्य मागे घेण्याबाबत भारत आणि चीन यांच्यात करार होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.चीनने अनेक ठिकाणी प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवर (एलएसी) स्वतःचे बदल केले आहेत, ज्याला ते 'परसेप्शन'ची लढाई म्हणतात. जून २०२०पासून दीर्घ चर्चेत, गलवान व्हॅली, पँगॉन्ग त्सोच्या उत्तरेकडील, कैलाश रेंज, पेट्रोलिंग पॉइंट्स १७–१७ ए आणि १५–१६ या पाच भागांत बफर झोन तयार करण्यात आले. फिंगर–४ आणि फिंगर–८ पँगॉन्ग त्सोच्या उत्तरेस फक्त ८–१० किमी आहेत.ब्रिक्स शिखर परिषदेदरम्यान पंतप्रधान मोदी आणि राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांच्यात पुन्हा बैठक होण्याची शक्यता आहे. यामध्ये प्रत्यक्ष नियंत्रण रेषेच्या कराराबाबत अंतिम चर्चा होऊ शकते. तथापि, यापूर्वी गलवान संघर्षापूर्वी दोन्ही नेते १८ वेळा भेटले होते; परंतु २०२० मध्ये भारत–चीन सीमेवर झालेल्या संघर्षानंतर दोन्ही नेते फक्त दोनदा भेटले आहेत, ते २०२२ मध्ये इंडोनेशियामध्ये जी–२० शिखर परिषदेदरम्यान आणि २०२३ मध्ये दक्षिण आफ्रिकेत ब्रिक्स शिखर परिषदेदरम्यान. त्यामुळे २२–२३ ऑक्टोबर दरम्यान, रशियातील कजानमध्ये होत असलेल्या परिषदेत पंतप्रधान मोदी आणि शी जिनपिंग यांच्यात द्विपक्षीय चर्चा होऊ शकते. रशियाच्या पुढाकाराने भारत आणि चीन यांच्यातील ताणलेले संबंध सुधारण्याचा प्रयत्न होत आहे. तसे पाहावयास गेले तर ब्रिक्स देशांमध्ये ब्राझील, रशिया, भारत, चीन आणि दक्षिण आफ्रिका या देशांचा समावेश असल्याने आता हे सर्व देश मिळून नव्या चलनाबाबत विचार करत आहेत. जर नवीन चलनावर सहमती झाली, तर त्याचे सदस्य देश अमेरिकन डॉलरच्या बदल्यात या नवीन चलनात परस्पर व्यवहार करू शकतील. हा अमेरिकेसाठी मोठा धक्का ठरू शकतो. त्याचे कारण सध्याच्या आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवस्थेवर अमेरिकन डॉलरचे वर्चस्व आहे. व्यापारात चलनाचा वाटा सुमारे ९० टक्के आहे. जवळजवळ १०० टक्के तेलाचा व्यापार अमेरिकन डॉलरमध्ये होतो. अमेरिकेविरुद्धच्या या मोहिमेत चीन–भारत आणि रशियालाही पाठिंबा देऊ शकतो; परंतु ब्रिक्स चलनाची क्षमता आणि गुंतवणूकदारांसाठी त्याचे संभाव्य परिणाम पाहण्याची हीच वेळ आहे, असे मानायला हरकत नाही.

# रिपाइंला डावलने महायुतीला महागात पडणार?

## आक्रमक: प्रभाकर चांदणे–धम्मा पारवेकरांची खदखद

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

रिपाइं (आ) पक्षाचा महाराष्ट्रातील बुलंद आवाज म्हणून पप्पू कागदे यांची राज्यभरात आहे. २०१४ आणि २०१९ च्या नंतर म्हणजे आत्ता २०२४ विधानसभेला पप्पू कागदे यांना महायुतीकडून बीडमधील केज राखीव मतदार संघातून संधी मिळावी. अशी सर्वस्तरातून मागणी होत असतांना मात्र महायुतीने रपाइंचा विश्वासघात करुन राज्यातच काय तर केज राखीव मतदार संघाची उमेदवारी देखील पप्पू कागदे यांना डावल्याने राज्यभरातील रिपाइंच्या कार्यकर्ते–समर्थकांसह बहुजन समाजात असंतोष पसरला आहे. यामुळे एकंदरीतच महायुतीने विशेषत: भाजपाने रिपाइंच्या प्रस्तावाला विचारात न घेतल्याने महाराष्ट्रात स्वत:च्या पायावर धोंडा मारुन घेतला आहे. राज्याच्या प्रत्येक विधानसभा मतदार संघात याचा महायुतीला सर्वाधिक फटका बसेल. तसेच आत्ता महायुतीला अद्दल घडविण्यासाठी बीड जिल्ह्यातील रिपाइंचे कार्यकर्ते आणि समर्थक सज्ज झाले असून रिपाइंची ताकद आत्ता तटस्थ राहणार असल्याची भूमिका आणि मनातील खदखद रिपाइंचे प्रभाकर चांदणे आणि धम्मा पारवेकर यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे व्यक्त केली आहे.

प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे, की रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आ) पक्षाची शक्ती महाराष्ट्रासह देशात मोठ्या प्रमाणात आहे. रिपाइंचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री रामदास आठवले यांच्यामुळे भाजपाची सत्ता केंद्रात आणि राज्यात देखील आली; हे भाजपाचे वरिष्ठ नेते सार्वजनिकरित्या मान्य करतात. त्यामुळेच रिपाइंचे राष्ट्रीय




अध्यक्ष आणि केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री रामदास आठवले यांनी २०२४ च्या मात्र त्यातच आत्ता महाराष्ट्रात होत असलेल्या विधानसभेच्या निवडणूकांमध्ये रिपाइंने महायुतीला २० जागेंचा प्रस्ताव दिला होता. त्यातही बीड जिल्ह्यात सर्वाधिक रिपाइंची ताकद असल्यामुळे जिल्ह्याच्या केज राखीव मतदार संघातून रिपाइंचे युवक प्रदेशाध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांना उमेदवारी मिळावी. म्हणून जिल्ह्यातीलच नव्हेतर संपूर्ण महाराष्ट्रातील रिपाइंचे कार्यकर्ते समर्थकांसह बहुजन समाजाची मागणीने जोर धरला. परंतू नेहमीप्रमाणे म्हणजे रिपाइंच्या प्रस्तावाकडे महायुतीच्या नेतृत्वाने जाणिवपूर्वक दुर्लक्ष करुन महायुतीच्या जाहिर केलेल्या जागेच्या यादीमधुन बीड मधील केज राखीव मतदार संघाच्या जागेवर भाजपाने आपला उमेदवार जाहिर करुन पप्पू कागदे यांना डावले. यामुळे सर्वच बहुजन समाजासह रिपाइंच्या महाराष्ट्रातील कार्यकर्त्यांमध्ये असंतोषाची लाट पसरली आहे. त्यामुळे यंदाच्या विधानसभा निवडणुकीत महायुतीला राज्यातील रिपाइंच्या ताकदीला मुकावे लागणार आहे. कारण तश्याप्रकारची भूमिका कार्यकर्त्यांनी घेतल्याने याचा फटका महायुतीला राज्याच्या प्रत्येक विधानसभा मतदार संघासह केज राखीव मतदार संघात सर्वाधिक बसणार असल्याची भावना प्रभाकर चांदणे व धम्मा पारवे यांनी व्यक्त केली असून आत्ता रिपाइंचे कार्यकर्ते महायुतीला अद्दल घडविणार असल्याचा निर्धार प्रत्येकाने केला असल्याचेही ते म्हणाले.

### आठवले साहेबांच्या निणर्याकडे कार्यकर्त्यांचे लक्ष

रिपाइंचे कार्यकर्ते–समर्थकांसह तमाम बहुजन समाजाची भावना लक्षात घेवून पप्पू कागदे यांना केज रावीव मतदार संघातून उमेदवारी मिळावी तसेच महाराष्ट्राच्या अन्य विधानसभा मतदार संघात किमान २० जागा मिळाव्यात यासाठी महायुतीकडे प्रस्तावातून मागणी केली होती. परंतू महायुतीने रिपाइंच्या प्रस्तावाचा विचार न करता त्याकडे सोयीस्कररित्या दुर्लक्ष केल्याने रिपाइंचा प्रत्येक स्वाभिमानी कार्यकर्ता दुखावला गेला आहे. त्यामुळे रिपाइंच्या शक्तीची जाण महायुतीला करुन देण्यासाठी आठवले साहेब काय रणनिती आखणार? आणि निर्णय घेणार याकडे रिपाइं कार्यकर्त्यांसह समर्थकांचे लक्ष लागले आहे.

### पप्पू कागदेंच्या उमेदवारीसाठी कार्यकर्त्यांचा अट्टाहास

केज राखीव मतदार संघातून पप्पू कागदेंच्या उमेदवारीसाठी गेल्या दहा–पंधरावर्षापासून बीड जिल्ह्यातील रिपाइं कार्यकर्त्यांचा नव्हेतर तमाम बहुजन समाजाचा अट्टाहास कायम राहिला आहे. तसे पाहिले तर केज राखीव मतदार संघावर रिपाइंचा हक्क असतांना ऐनवेळी मात्र रिपाइं–भाजपाची युती असतांना सुद्धा कायम भाजपाने केज राखीव मतदार संघावर दावा ठोकला. परंतू रिपाइंने प्रत्येकवेळी समजूतदारपणाची भूमिका घेत माघार घेत भाजपाला सहकार्य केले आहे. परंतू २०२४ च्या विधानसभा निवडणूकच्या वेळी देखील भाजपाने तोच कित्ता गिरवल्याने जिल्ह्यासह राज्यात भाजपाला धडा शिकविण्यासाठी बहुजन समाज सज्ज झाला असल्याची भावना कार्यकर्ते व्यक्त करु लागले आहेत.

## पान एक वरून

**वंचितच्या गोटात**

पक्षाकडून जयसिंग सोळंके यांच्यामुळे पक्षाचे नुकसान होईल ही बाब लक्षात आल्यानंतर प्रकाश सोळंके यांना ही उमेदवारी देण्यात आली. राष्ट्रवादी शरद पवार गटाकडून जागेचा तिढा अजून सुटलेला नाही.खरंतर माजलगाव मतदार संघात प्रत्येक पक्षाकडून प्रस्थापित वर्गाला उमेदवारी दिली जाते. मात्र राज्यात एकमेव वंचित बहुजन आघाडी एक असा पक्ष असून विस्थापित लोकांना तो संधी देत आलेला आहे. त्यामुळेच शेख मंजूर यांना वंचितची उमेदवारी देण्यात आली असावी. असे म्हटले तरी देखील ही उमेदवारी निश्चित आहे की? नाही हा प्रश्न मात्र अनुत्तरीत राहतो. कारण वंचितच्या गटात राजकीय खलबते सुरु असून माजलगावची उमेदवारी बाबरी मुंडे यांना दिली जाणार आहे. अशी विश्वसनीय माहिती सूत्रांकडून हाती लागली आहे.तसे पाहता, भारतीय जनता पक्षाचे समर्थक बाबरी मुंडे निवडणूक लढण्यावर ठाम आहेत. त्यामुळे त्यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला असावा. माजलगाव मतदार संघात ओबीसी आणि ओपन अशी लढत होणार असून बाबरी मुंडे शेख मंजूर यांच्यापेक्षा अधिक प्रबळ ठरू शकतात असा अंदाज आल्याने वंचित बहुजन आघाडीच्या राजकीय गोटामध्ये कदाचित उमेदवार बदलण्याचे संकेत असावेत. त्यामुळे शेख मंजूर यांच्या उमेदवारी ऐवजी बाबरी मुंडे यांना उमेदवारी दिली जाण्याची दाट शक्यता विश्वसनीय सूत्राकडून मिळाली आहे. परंतु येणाऱ्या काळात नेमकी काय परिस्थिती राहते याकडे मात्र जिल्ह्याचे लक्ष लागले आहे?

**आष्टीत महेबूब शेख यांचे**

अभिवादन केले. आष्टी मतदार संघ राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार) पक्षाची अधिकृत उमेदवारी महेबुब शेख यांना नुकतीच जाहीर झाल्यानंतर कड्यासह आष्टीत कार्यकर्त्यांनी सायंकाळी फटाक्यांची आतिषबाजी करत जल्लोष साजरा करण्यात आला. आज शेख यांचे सकाळी धानोरा येथे आगमन झाले ढोल– ताशांच्या गजरात ठिकठिकाणी जोरदार स्वागत करण्यात आले. त्यानंतर धानोरा येथील चौकाचौकात रॅली काढून महापुरुषांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले. कड्यासह आष्टीत सवाद्य मिरवणूक काढून जोरदार स्वागत झाले तर आष्टी शहरात जेसीबीतून शेख यांच्यावर पुष्पवृष्टी करण्यात आली. फटाक्यांची आतिषबाजी ढोलताशांच्या गजरात रॅली किनारा चौकापासून आण्णाभाऊ साठे यांना चौकात अभिवादन करून झाली. स्व. गोपीनाथ मुंडे चौकात साहेबांना अभिवादन करण्यात आले त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे महाराजांना अभिवादन करण्यात आले आष्टीत चौकाचौकात महापुरुषांना अभिवादन करण्यात आले. यावेळी महेबुब भाई तुम आगे बढो हम तुम्हारे साथ है जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. यावेळी कार्यकर्त्यांमध्ये उत्साह होता यावेळी तालुकाध्यक्ष सुनिल नाथ, विजय गाढवे, युवक कार्याध्यक्ष तथा माजी सरपंच राहुल काकडे, दादासाहेब झांजे,दिपक होले, ड रिजवान शेख, नदिम शेख, नगरसेवक भिमराव गायकवाड, अंकुश खोटे,जिशान सय्यद, अमोल चव्हाण, भाऊसाहेब मेटे,संतोष सानप,अतुल शिंदे, तौफिक शेख,भैरव चव्हाण, सचिन गोंदकर, सोमनाथ निकाळजे, अंबादास पवार, राजेसाहेब निंबाळकर, सचिन पवार,लहू भवर, शिवाजी शेळके, दत्तात्रय कांबळे,परमान शेख, माऊली कांबळे, सुधाकर भगत, सोहेल बेग,जमीर पठाण, अस्लम मोगल,जल्लाल शेख, हाफिज मोसिम सय्यद, मुजामिल शेख, अरबाज बेग, महम्मद शेख आदी पदाधिकारी, कार्यकर्ते, युवक मोठ्या संख्येने रॅली सहभागी झाले होते.

**महाराष्ट्रातल्या नेत्यांवर**

उत्तर दिलं आहे.आज आमच्या काँग्रेसची बैठक पार पडली, आम्ही इतर जागांवर चर्चा केली. जी यादी ठरवली आहे ती यादी लवकरच तुम्हाला मिळेल. काँग्रेसची शनिवारी आणखी एक बैठक होणार आहे ती ऑनलाईन स्वरुपाची असेल. त्यानंतर आम्ही सगळ्या जागा घोषित करु. महाविकास आघाडी एकत्रितपणे समोर जात आहोत. आघाडी म्हटल्यानंतर थोडंफार जागांवरुन काही गोष्टी घडतात. महाराष्ट्रातील जनतेची स्वप्नं पूर्ण करण्यासाठी आम्ही निवडणूक लढवत आहोत. आम्हाला हा विश्वास आहे की महाविकास आघाडीच्या नेतृत्वात महाराष्ट्रात सरकार स्थापन होईल. या भ्रष्ट सरकारला हटवण्यासाठी लोक आतूर आहेत. लोकसभेला जसे निकाल लागले तसेच निकाल येत्या विधानसभेलाही लागलेले दिसतील. असं चेन्निथला म्हणाले आहेत.आज आम्ही दिल्लीत दुसऱ्या यादीबाबत चर्चा केली. आमची दुसरी आणि तिसरी यादी लवकरच येईल. महाविकास आघाडी म्हणून आम्ही निवडणुकीला सामोरे जात आहोत. महाराष्ट्रात आमची कामगिरी चांगली झालेली दिसेल. महाविकास आघाडीचं सरकार पूर्ण बहुमतात आलेलं तुम्हाला दिसेल. लोकसभेला जशी कामगिरी झाली त्याहून चांगली कामगिरी आम्ही महाराष्ट्र विधानसभेला करु. या भ्रष्ट आणि शिवद्रोही सरकारला आम्ही घालवणार आहोत. या सरकारला मुळासकट उखडून टाकण्याचा निर्णय महाराष्ट्राच्या जनतेने घेतला आहे. भाजपाकडून फेक नरेटिव्ह पसरवलं जातं आहे. आमच्या विरोधात खोट्या बातम्या चालवून ते लोकांची दिशाभूल करत आहेत. नरेंद्र मोदी आणि अमित शाह जेवढ्या सभा करतील तेवढा जास्त फायदा महाविकास आघाडीला होईल असं नाना पटोले म्हणाले.

**महाविकास आघाडीत पहिली**

मिळून एकूण २७० जागांवर एकमत झालं आहे. उर्वरित १८ जागांवर शेकाप, कम्युनिस्ट, समाजवादी पक्षांसोबत चर्चा सुरु आहेत. लवकरच या जागांवर आमच्यामध्ये स्पष्टता येईल. महाविकास आघाडी म्हणून ही निवडणूक लढत आहोत. महाराष्ट्रात मविआचं सरकार येईल, असं नाना पटोले म्हणाले. शरद पवार यांच्यासह झालेल्या बैठकीनंतर मविआच्या सर्व पक्षाच्या नेत्यांनी पत्रकार परिषद घेत जागावाटपासंदर्भातील घोषणा केली आहे. मविआ १८ जागा कुणाला देणार याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे. अशातच अबू आझमी यांनी त्यांना २५ जागा मिळाल्या नाहीत तर वेगळं लढण्याचा निर्णय घेऊ असा इशारा दिला आहे.

**तर महाविकास आघाडीत पहिली ठिणगी :** अबू आझमी यांना अपेक्षित जागा मिळाल्या नाहीत तर त्यांनी स्वतंत्र उमेदवार देऊन लढण्याचा इशारा दिला आहे. तसं घडलं तर महाविकास आघाडीत पहिली ठिणगी पडेल यात काहीही शंका नाही.

**ओमप्रकाश बुरांडेंवर शुभेच्छांचा**

तसेच विविध क्षेत्रातील संस्थांकून ओमप्रकाश बुरांडे यांना शुभेच्छा देण्यात आल्या.

दरम्यान, दै. मराठवाडा साथी कार्यालयात ओमप्रकाश बुरांडे यांचा वाढदिवानिमित्त परळी शहर व तालुक्यातील सर्व संपादक, पत्रकार यांच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी ज्येष्ठ पत्रकार सुधीर गोस्वामी, लोकमतचे संजयजी खाकरे, दै. दिव्य मराठीचे प्रतिनिधी धनंजय आढाव, पुण्यनगरीचे धनंजय आरबुने, दै. महाराष्ट्र प्रतिमाचे संपादक ज्ञानोबा सुरवसे, फुले– आंबेडकरी अभ्यासात भगवान साकसमुद्रे, दै. संघर्षनेताचे संपादक मोहन व्हावळे, पत्रकार दत्तात्रय काळे, जगदीश शिंदे, अनुप कुसुमकर, अतुल्य महाराष्ट्रचे संपादक नितीन ढाकणे, प्रा. दशरथ रोडे,संतोष जुजगर, बालाजी ढगे, लक्ष्मण वैराळ सर, संतोष बारटक्के, श्रीराम लांडगे, अनिल भंडारी, नरसिंग अन्नलदास, प्रकाश वर्मा, दै. मराठवाडा साथीचे कार्यालयीन व्यवस्थापक रमेश मस्के, अनिल गायकवाड आदींसह अनेकजण उपस्थित होते.महाराष्ट्र वीरशेव सभे वतीने ज्येष्ठ पत्रकार ओमप्रकाश बुरांडे यांना वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन करताना महाराष्ट्र वीरशेव सभेचे तालुकाध्यक्ष महादेव इटके भाजपा युवा कार्यकर्ते अश्विन मोगरकर शिवसेना माजी नगरसेवक रमेश चौंडे विकास प्रतिष्ठानचे सहसचिव विकास हालगे मुद्रा लोन समिती बीड जिल्हा सदस्य सुशील हरंगुळे शिवसेना चे सचिन स्वामी यावेळेस उपस्थित होते

**कॅनडाने भारताच्या पाठीत**

केले आहे. तेथे बंदुक चालवणे आणि मानवी तस्करीचे प्रकार सर्रास होतात. तरीही कॅनडातील अधिकारी त्याकडे डोळेझाक करतात. 'मतपेढी' हे त्यामागे एकमेव कारण असल्याचे वर्मा यांनी मुलाखतीत म्हटले आहे.द्विपक्षीय संबंधांसाठी कॅनडाचा हा सर्वांत अव्यावसायिक दृष्टीकोन आहे. दोन्ही देशांमधील संबंध मोठे आहेत, असे त्यांना वाटत असेल, तर हा मुद्दा हाताळण्यासाठी त्यांच्याकडे इतर राजनैतिक साधने उपलब्ध आहेत आणि त्या साधनांचा वापर हे संबंध कायम ठेवण्यासाठी केला जाऊ शकतो, असे वर्मा यांनी सांगितले.

## पान सहा वरून

**दोन दिवसात निर्णय घ्या,**

मान्य राहिल असा निर्णय घेऊन आज रिपब्लिकन कार्यकर्त्यांनी महायुती विरुद्ध केलेले आंदोलन स्थगित केले. यावेळी रिपब्लिकन पक्षाचे युवक आघाडी महाराष्ट्र अध्यक्ष पप्पू कागदे, मुंबई अध्यक्ष सिद्धार्थ कासारे , मुंबई प्रदेश सरचिटणीस विवेक पवार ईशान्य जिल्हाध्यक्ष अजित रणदिवे जिल्हाध्यक्ष संजय डोळसे, जिल्हाध्यक्ष प्रकाश जाधव,जिल्हाध्यक्ष रमेश गायकवाड संघटन सचिव परशुराम वाडेकर महिला आघाडीच्यानेत्या उषाताई रामलू,आशाताई लांडगे, रेश्मा खान, छायाताई खंडागळे, मुंबई उपाध्यक्ष सो.ना कांबळे तसेच योगेश शीलवंत रवी गायकवाड, संजय खंडागळे मुंबई प्रदेश युवक आघाडी जिल्हाध्यक्ष भाग्यराज परियार ,रूकेश भालेराव,सुनील बोर्डे,विनोद जाधव , सचिन कासारे युवक सरचिटणीस संतोष शरणागत आदी अनेक नेत्यांनी आजच्या आंदोलनाचे नेतृत्व केले.

**कार्यकर्तुत्वाला मिळाली पदाची**

उपजिल्हाप्रमुखपदी संतोष लक्ष्मण चौधरी (परळी वैजनाथ), अंबाजोगाई तालुकाप्रमुखपदी विशाल कुंडलिक काशीद, केज तालुका प्रमुखपदी सुग्रीव सखाहरी सक्राते, परळी वैजनाथ तालुकाप्रमुखपदी लक्ष्मण (बाबा) सोमनाथ सोनवणे, परळी विधानसभा अध्यक्षपदी विष्णू गोविंद सलगर, परळी शहराध्यक्षपदी कृष्णा अशोक सुरवसे, केज शहराध्यक्षपदी आकाश बाजीराव चाळक यांची तर अंबाजोगाई शहराध्यक्षपदी समिरण बापूराव मसलकर यांची निवड करण्यात आली. युवा सेनेच्या नूतन पदाधिकाऱ्यांचे शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, अनिल जगताप व मराठवाडा निरीक्षक विपुल पिंगळे यांनी स्वागत केले आहे. नूतन पदाधिकाऱ्यांच्या निवडीमुळे बीड जिल्ह्यात युवासेना अधिक सक्षमपणे उभा राहिल असा विश्वास शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी व्यक्त केला आहे.

**संधी साधून चोरायचे**

विचारपूस करून दिनांक२३–१०–२०२४ रोजी येथून जनावरे चोरी करणारे आरोपी चोरी करण्यासाठी वापरत असलेले बोलेरो पिकअप वाहन सेंट्रल नाका हद्दीतून जप्त करण्यात आले आहे सदर बाबतीत पोलीस स्टेशन बिबी येथे दाखल अपराध नंबर २१६/२०२४ कलम ३०३ (२)इछ्ड चे गुन्ह्यातील चोरी केलेली चार जनावरे किमत एक लाख २५ हजार रुपये व एक बोलेरो पिकप वाहन किंमत ४ लाख रुपये असा एकूण पाच लाख २५ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे पोलीस स्टेशन बिबी येथे पोलीस कोठडीमध्ये असलेला आरोपी नामे शेख रहीम शेख खमरुद्दीन वय वर्षे ३२ रा हर्सूल ग्रीन पार्क सोसायटी छत्रपती संभाजी नगर याच्याकडे पोलिसांनी केलेल्या तपासामध्ये पोलीस स्टेशन बिबी येथे दाखल जनावर चोरीचे एकूण पाच गुन्हे दिनांक २८– ७ –२०२४ दाखल असलेले अप नंबर २९६/२०२४ पोलीस स्टेशन सिंदखेडराजा येथे दाखल अप नंबर १४५/२०२४ पोलीस अप नंबर १६४/२०२४ पोलीस स्टेशन नंबर ४८२/२०२४ दाखल अप नंबर २१०/२०२४ पोलीस स्टेशन बिबीचे ठाणेदार यांनी उकल करून गुन्हे उघड केले आहे सदर गुन्ह्याच्या तपासात गुन्ह्यातील इतर आरोपी निष्पन्न करण्यात आले असून त्या संबंधाने तपास सुरू आहे सदर कार्यवाही माननीय अधीक्षक विश्व पानसरे बुलढाणा यांच्या मार्गदर्शनाखाली अप्पर पोलीस अधीक्षक बि बी महामुनी –अप्पर पोलीस अधीक्षक अशोक थोरात उपविभागीय पोलीस अधिकारी प्रदीप पाटील साहेब मेहकर यांच्या मार्गदर्शनाखाली बिबी पोलीस स्टेशनचे ठाणेदार संदीप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोकॉ रामेश्वर शिंदे –पोलीस हेड कॉन्स्टेबल– गजानन चतुर – ना पो का अरुण सानप– पोलीस कॉ भारत ढाकणे –पोलीस कॉ रवींद्र बोरे– पोलीस कॉ यशवंत जवळ –(सायबर सेल) ऋषिकेश खंडेराव यांनी ही कारवाई केली आहे.

**माजलगावचे वातवरण**

ही निवडणूक मी अपक्ष म्हणून लढवत आहे. तेव्हा मतदार मलाच विजयी करतील असा आत्मविश्वास माधव निर्मळ यांनी यावेळी बोलताना व्यक्त केला आहे. दरम्यान माजलगाव विधानसभा निवडणुकीत गेल्या तीन दिवसांमध्ये निवडणूक अधिकारी यांच्याकडे दहा उमेदवारी अर्ज दाखल झाले असल्याचे समजते.

**पंचशील नगरमध्ये**

यांच्या हस्ते होईल व नंतर सर्वांना भोजनदान देयात येईल तरी बीड शहरातील सर्व बौद्ध उपासक उपासीका, समाजबांधव यांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहून पुज्ञ भंते यांची धम्मदेसना श्रवण करावे असे ॲड तेजस वडमारे यानी केले आहे.

**विश्वासाला तडा जाऊ**

एकमुखी पाठिंबा देत असुन त्यांचा पाठीमागे खंबीरपणे उभे राहणार असल्याची ग्वाही शेतकरी मंडळाचे पदाधिकारी यांनी दिली.यावेळी राजेंद्र गाडे जगन्नाथ पवार पाटील नाना बाचकर केशव बेलेकर अनुराधा मंडलिक शिवाजी झिने संदीप गावडे संतोष ढगे सावित्रा गुलदगड युवराज पवार संदीप गाडे सागर गाडे सुभाष बेलेकर अण्णासाहेब डोईफोडे यांच्या सह राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष मच्छिंद्र सोनवणे कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती बाळासाहेब खुळे सदस्य रामदास बाचकर मा सरपंच पप्पू माळवदे आदी सह पदाधिकारी उपस्थित होते. राहुरी येथील आमदार प्राजक दादा तनपुरे यांच्या कार्यालयात स्वर्गीय शिवाजीराजे गाडे यांच्या शेतकी मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी जाहीर पाठिंबा देण्यासाठी बैठकीची आयोजन केले होते या बैठकीस अनेक भागातील स्व शिवाजीराजे गाडे यांना मानणारे सरपंच तसेच ग्रामपंचायत सदस्य व सोसायटीचे चेअरमन व सदस्य व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स ॲन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी–०२४४२–२९९०८४,ई–मेल–beedpunyabhumi@gmail.com

Daily Beed punyabhumi news paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

# पंतप्रधान मोदींच्या ब्रिक्स दौऱ्यावर पाकिस्तानचे लक्ष

वृत्तसंस्था

**इस्लामाबाद :** भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी १६ व्या ब्रिक्स परिषदेत सहभागी होण्यासाठी रशियातील कझान येथे गेले आहेत. यावेळी त्यांचे भव्य स्वागत करण्यात आले. येथे त्यांनी चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांचीही भेट घेतली. चीन आणि पाकिस्तानचे घट्ट संबंध आहेत, त्यामुळे पंतप्रधान मोदींच्या ब्रिक्स दौऱ्यावर पाकिस्तानचे लक्ष आहे.

पाकिस्तानी यूट्यूब चॅनल रियल एंटरटेनमेंट टीव्हीने एक व्हिडिओ जारी केला आहे. यामध्ये पाकिस्तानी लोकांना पंतप्रधान मोदींच्या रशिया दौऱ्याबद्दल विचारण्यात आले. व्हिडिओमध्ये एक तरुणी असे म्हणते की, आज भारत ब्रिक्समध्ये रशियात पोहोचला आहे. तेथे पाकिस्तान सदस्य तर नाहीच, मात्र साधा निरिक्षकही नाही. आपला शत्रू भारत, रशिया किंवा चीन नाही तर अज्ञान हा आपला शत्रू आहे. आज पंतप्रधान मोदींचे स्वागत कसे झाले ते पाहा. आपले स्वागत आहे, असे खुद्द रशियाने म्हटले आहे. आम्हाला भारतासोबत चांगले संबंध हवे आहेत, ही मोठी गोष्ट आहे की एका शक्तिशाली देशाला भारत आणि पंतप्रधान मोदी यांच्यात मैत्री हवी आहे.

# शांतता आणि स्थैर्याला प्राधान्य हवे

## जिनपिंग भेटीत मोदींनी व्यक्त केली अपेक्षा



**कझान :** पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांनी आज रशियामध्ये २०१९ नंतरची पहिली द्विपक्षीय बैठक घेतली. सीमेवर शांतता आणि स्थैर्य राखणे हे आमचे प्राधान्य असले पाहिजे. आमचा विश्वास आहे की भारत-चीन संबंध केवळ आमच्या लोकांसाठीच नाही तर शांतता, स्थिरता आणि विकासासाठीही महत्त्वाचे आहेत असे मोदी यांनी जिनपिंग यांना म्हटले आहे.


पंतप्रधानांनी त्यांच्या अधिकृत एक्स हँडलवर लिहिले की, भारत-चीन संबंध आपल्या देशांच्या लोकांसाठी आणि प्रादेशिक आणि जागतिक शांतता आणि स्थिरतेसाठी महत्त्वपूर्ण आहेत. परस्पर विश्वास, परस्पर आदर आणि परस्पर संवेदनशीलता द्विपक्षीय संबंधांना मार्गदर्शन करेल. पंतप्रधान मोदींसोबतच्या द्विपक्षीय भेटीदरम्यान जिनपिंग म्हणाले की, कझानमध्ये तुम्हाला भेटून खूप आनंद झाला.

# अरविंद केजरीवाल महाराष्ट्रात प्रचार करणार

वृत्तसंस्था

**नवी मुंबई:** विधानसभा निवडणुकीत आम आदमी पक्षाचे राष्ट्रीय संयोजक अरविंद केजरीवाल महाराष्ट्रात प्रचार करणार आहेत. इंडिया आघाडीचा घटक पक्ष म्हणून अरविंद केजरीवाल महाविकास आघाडीच्या उमेदवारांचा प्रचार करणार आहेत. उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार गट यांच्या उमेदवारांचा प्रचार करणार आहेत. अरविंद केजरीवाल काँग्रेस पक्षाचा प्रचार करणार नाहीत, अशी माहिती आम आदमीच्या नेत्यांनी दिली आहे.

## केजरीवाल यांना पवार, ठाकरेंचे निमंत्रण



अरविंद केजरीवाल मुंबई, पुणे, नागपूर शहरसह विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्रात प्रचार करणार आहेत. लिकर पॉलिसीमधील भ्रष्टाचार प्रकरणात केजरीवाल जेलमध्ये गेल्यानंतर भारतीय जनता पक्षाच्या विरोधात अधिक आक्रमक झाले आहेत.

# हरियाणा, पंजाब सरकारवर सुप्रीम कोर्टाची टीका

## प्रदूषणाच्या परिस्थितीवर न्यायालयाची टिपणी

वृत्तसंस्था

**नवी दिल्ली :** दिल्ली-एनसीआरमधील प्रदूषणाच्या बिघडलेल्या परिस्थितीवर सर्वोच्च न्यायालयाने बुधवारी कडक शब्दात ताशेरे ओढले. प्रदूषणाबाबत झालेल्या सुनावणीत हरियाणा, पंजाबसह केंद्र सरकारवरही सुप्रीम कोर्टाने नाराजी व्यक्त केली. गेल्या आठवड्यात याच प्रकरणावर सुनावणी करताना न्यायालयाने हरियाणा आणि पंजाब सरकारलाही भुसभुशीत शेतकऱ्यांवर कारवाई न केल्याबद्दल खडसावले होते. याशिवाय दोन्ही राज्यांच्या मुख्य सचिवांनाही समन्स पाठवण्यात आले होते. पंजाब आणि हरियाणा सरकारवर टीका करताना सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे की, दोन्ही राज्यांनी पेंढा जाळणाऱ्यांवर कोणतीही दंडात्मक कारवाई केली नाही. या सरकारांना कायद्याची अंमलबजावणी करण्यात खरोखरच रस असेल तर किमान खटला तरी चालेल, असे न्यायालयाने म्हटले आहे. सुप्रीम कोर्टाने पंजाबच्या मुख्य सचिवांना सांगितले की सुमारे १०८० उल्लंघन करणाऱ्यांवर एफआयआर नोंदवण्यात आला होता; परंतु तुम्ही केवळ ४७३ लोकांकडून नाममात्र दंड वसूल केला आहे. तुम्ही ६०० किंवा त्याहून अधिक लोकांना वाचवत आहात.

# भारत चीन करारावर काँग्रेसची जोरदार टीका; जयराम रमेश यांनी विचारले प्रश्न

वृत्तसंस्था



**नवी दिल्ली:** पूर्व लडाखमध्ये चीनसोबतच्या कराराची घोषणा झाल्यानंतर आता काँग्रेसने यावर टीका केली आहे. भारत आणि चीन यांच्या गेल्या वर्षांहून अधिक काळ चाललेल्या संघर्षासाठी काँग्रेसने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना जबाबदार धरत दोष दिला असून त्यांना सहा प्रश्नही विचारले आहेत. काँग्रेस नेते जयराम रमेश म्हणाले, चीनच्या बाबतीतील हा प्रकार पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या अज्ञानाचा प्रकार आहे. गुजरातचे मुख्यमंत्री असताना चीनने मोदींचे तीनदा भव्य स्वागत केले होते.

पंतप्रधान म्हणून, त्यांनी चीनला पाच अधिकृत भेटी दिल्या आणि चीनचे पंतप्रधान शी जिनपिंग यांच्यासोबत १८ बैठका घेतल्या, ज्यात त्यांच्या ६४ व्या वाढदिवसानिमित्त साबरमतीच्या काठावरील एका मैत्रीपूर्ण झोपाळा सत्राचाही समावेश आहे. १९ जून २०२० रोजी जेव्हा पंतप्रधानांनी चीनला आपली कुप्रसिद्ध क्लीन चिट दिली तेव्हा भारताची परिस्थिती सर्वात खालच्या टप्प्यावर पोहोचली. कोणीही आमची सीमा ओलांडली नाही किंवा कोणीही घुसखोरी केली नाही. हे विधान गलवान चकमकीच्या अवघ्या चार दिवसांनंतर करण्यात आले होते.

# अमेरिकेत हिंसाचार पसरवला जाण्याची शक्यता?

वृत्तसंस्था



**वॉशिंग्टन :** रशिया, चीन आणि इराण येत्या ५ नोव्हेंबरला देशात होणाऱ्या निवडणुकांपूर्वी फूट पाडून अमेरिकनांना फसवण्याचा आणि निवडणुकीनंतर हिंसाचार भडकावण्याचा प्रयत्न करत असल्याचा संशय अमेरिकन गुप्तचर अधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे. अमेरिकन निवडणुकीच्या सुरक्षेबाबत पत्रकारांना माहिती देताना गुप्तचर अधिकाऱ्यांनी ही भीती व्यक्त केली.

ते म्हणाले की परकीय शक्ती त्यांचे हेतू पूर्ण करण्यासाठी हिंसाचार पसरवण्यासाठी धमक्या आणि प्रचाराचा वापर करू शकतात. या शक्तींना अनिश्चितता निर्माण करून निवडणूक प्रक्रियेवर प्रभाव पाडायचा आहे. ते म्हणाले की, परकीय शक्ती विशेषतः रशिया, इराण आणि चीन समाजात वितुष्ट निर्माण करण्यावर भर देत आहेत. नॅशनल इंटेलिजेंस ऑफिसच्या एका अधिकाऱ्याने सांगितले की, हे सैन्य आपले उद्दिष्ट साध्य करण्यासाठी या कारवायांमध्ये सतत सक्रिय असतात. तथापि, हे तिन्ही देश एकत्रितपणे ही काम करत आहेत किंवा स्वतंत्रपणे याचा खुलासा होऊ शकला नाही.



## इराक-सीरियातील कुर्दिस्तान वर्कर्स पार्टीच्या ३० ठिकाणी केले हल्ले

# अंकारातील हल्ल्याला तुर्कीचे प्रत्युत्तर

वृत्तसंस्था

**अंकारा:** अंकारामधील तुर्की एरोस्पेस इंडस्ट्रीजच्या मुख्यालयावर बुधवारी दहशतवादी हल्ल्याची घटना घटना घडली. या हल्ल्यामागे पीकेके या कुर्दिश बंडखोरांचा हात असण्याची अशी शक्यता वर्तवण्यात येत आहे. दरम्यान, या हल्ल्याच्या काही तासांनंतर आता तुर्कीनेही या हल्ल्याला प्रत्युत्तर दिले आहे. तुर्कीकडून उत्तर इराक आणि सीरियामधील कुर्दिस्तान वर्कर्स पार्टी (इख्ख) च्या ठिकाणांना करण्यात आले आहे. इराक-सीरियातील कुर्दिस्तान वर्कर्स पार्टीच्या ३० ठिकाणांवर केले हवाई हल्ले!


इंडिया टुडेने दिलेल्या वृत्तानुसार, तुर्कीने उत्तर इराक आणि सीरियातील पीकेकेच्या जवळपास ३० ठिकाणांना हवाई हल्ले केल आहेत. तुर्कीच्या संरक्षण मंत्रालयाकडून या संदर्भात माहिती देण्यात आली आहे. या हल्ल्यादरम्यान सामान्य नागरिकांना कोणतीही इजा पोहोचार नाही, याची दक्षता घेतली गेल्याचे संरक्षण मंत्रालयाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. तुर्कीच्या या हल्ल्यानंतर अद्याप पीकेकेकडून अधिकृत प्रतिक्रिया जाहीर झालेली नाही. तुसास मुख्यालयाच्या परिसरात गोळीबारानंतर मोठा स्फोट झाल्याची माहिती स्थानिक माध्यमांद्वारे प्रसारित करण्यात आली.

## आम्ही दहशतवादी हल्ल्याचा निषेध करतो

या हल्ल्यानंतर तुर्की सरकारमधील मंत्री अली येरलिकाया यांनी एक्स या समाज माध्यमावरही प्रतिक्रिया दिली होती. तुर्की एरोस्पेस इंडस्ट्रीजच्या मुख्यालयावर दहशतवादी हल्ला झाला आहे. दुर्दैवाने यात आपले काही जवान शहीद झाले आहेत. तर अनेक लोकं जखमी झाले आहेत, असे ते म्हणाले होते. तसेच अंकाराचे महापौर मन्सूर यावस यांनीही या हल्ल्यानंतर प्रतिक्रिया दिली होती. आम्ही दहशतवादी हल्ल्याचा निषेध करतो. या हल्ल्यात जे जवान शहीद झाले त्यांना श्रद्धांजली अर्पण करतो तसेच जे जखमी आहेत. ते लवकरात लवकर बरे व्हावे यासाठी प्रार्थना करतो असे ते म्हणाले होते.

# ट्रुडोंच्या सल्लागारानेच भारताविषयी गोपनीय माहिती पुरवली

वृत्तसंस्था



**ओटावा :** कॅनडाचे पंतप्रधान जस्टिन ट्रुडो यांचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार आणि उपविदेशमंत्र्यांनी अमेरिकेचे वृत्तपत्र वॉशिंग्टन पोस्टला भारताविषयी संवेदनशील गोपनीय माहिती पुरविली होती. कॅनडाच्या पोलिसांकडून जाहीरपणे भारतावर आरोप करण्यापूर्वीच ही माहिती लीक करण्यात आली होती. त्यानंतरच कॅनडाच्या पोलिसांनी भारत सरकारच्या कथित हस्तकांवर कॅनडात हत्या, खंडणीवसुली आणि हिंसक गुन्हेगारी कारवाया करण्याचा आरोप केला होता.

ट्रुडो यांचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार आणि गुप्तचर सल्लागार नथाली ड्रौइन आणि उपविदेशमंत्री डेव्हिड मॉरिसन यांनी वॉशिंग्टन पोस्टला कॅनडातील भारताच्या कथित हस्तक्षेपाविषयी माहिती दिली होती. कॅनडातील पोलीस आयुक्त माइक ड्यूहेम यांच्या पत्रकार परिषदेपूर्वी ही माहिती लीक करण्यात आली होती. वॉशिंग्टन पोस्टने त्याच दिवशी कॅनडाच्या अधिकाऱ्यांचा दाखला देत सुखदूल सिंह गिलच्या हत्येशी भारताला जोडले होते.

# इंडोनेशियन नागरिकांनी रोहिंग्यांचा केला निषेध

वृत्तसंस्था

**इंडोनेशिया :** मोठ्या संख्येने इंडोनेशियामध्ये प्रवेश करण्याचा प्रयत्न करणाऱ्या रोहिंग्या मुस्लिमांना स्थानिक लोकांनी बोटीतून उतरू दिले नाही. १४० रोहिंग्या मुस्लीम इंडोनेशियाच्या उत्तरेकडील प्रांत आचेच्या किनारपट्टीपासून सुमारे १ मैल (०.६० किलोमीटर) लाकडी बोटीतून उतरण्याचा प्रयत्न करत होते. यामध्ये प्रामुख्याने महिला आणि लहान मुलांचा समावेश होता ज्यांना स्थानिक रहिवाशांनी उतरण्याची परवानगी दिली नव्हती.

बांगलादेशातील कॉक्स बाजार ते दक्षिण आचे जिल्ह्यातील लबुहान हाजीच्या किनाऱ्या पर्यंतच्या जवळपास दोन आठवड्यांच्या प्रवासादरम्यान तीन रोहिंग्यांचा मृत्यू झाला, असे स्थानिक पोलिसांनी सांगितले. प्रकृती खालावल्याने अधिकाऱ्यांनी रविवारपासून ११ रोहिंग्यांना सरकारी रुग्णालयात दाखल केले. दक्षिण आचेमधील मासेमारी समुदायाचे प्रमुख मोहम्मद जबल म्हणाले, आमच्या मासेमारी समुदायाने त्यांना येथे उतरू दिले नाही, कारण इतर ठिकाणी जे घडले ते येथे घडावे असे आम्हाला वाटत नाही. ते जिथेही गेले तिथे स्थानिक लोकांमध्ये अस्वस्थता होत आहे. बंदरावर टांगलेल्या एका मोठ्या बॅनरवर असे लिहिले होते. दक्षिण आचे रीजन्सीतील लोक या प्रदेशात रोहिंग्या निर्वासितांचे आगमन नाकारतात.आचे पोलिसांच्या अहवालानुसार, रोहिंग्या मुस्लिमांचा गट ९ ऑक्टोबर रोजी मलेशियाला जाण्यासाठी कॉक्स बाजार सोडला होता. बोटीवरील काही प्रवाशांनी इतर देशांत जाण्यासाठी पैसे दिल्याचा आरोप आहे. जबल म्हणाले की, स्थानिक रहिवाशांनी गटाला जेवण दिले आहे. याशिवाय संयुक्त राष्ट्रांच्या निर्वासितांसाठीच्या उच्चायुक्तांनीही त्यांना अन्न पुरवले. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बोटीमध्ये २१६ लोक होते जेव्हा ती बांगलादेशातून निघाली होती आणि त्यापैकी ५० जण इंडोनेशियाच्या रियाउ प्रांतात उतरले होते.

## बोटीतून उतरूही दिले नाही



## विधानसभा अध्यक्ष निवडणुकीची तयारी पूर्ण

**जम्मू :** जम्मू-काश्मीरचे लेफ्टनंट गव्हर्नर मनोज सिन्हा यांनी विधानसभा अध्यक्षांच्या निवडणुकीची तारीख निश्चित केली आहे. ही निवडणूक सोमवार ४ नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी १०:३० वाजता होणार आहे. राजभवनच्या सूत्रांकडून ही माहिती मिळाली आहे. विधानसभा अध्यक्षांच्या निवडीची प्रक्रिया सुरळीत करण्यासाठी आवश्यक ती सर्व तयारी पूर्ण करण्याच्या सूचना नायब राज्यपालांनी दिल्या आहेत.

राज्यातील राजकीय घडामोडींमध्ये या निवडणुका महत्त्वाच्या मानल्या जात असून, त्यावर सर्वच राजकीय पक्षांच्या नजरा खिळल्या आहेत.

# सात बांधांच्या दुरुस्तीला सीआरझेडची मान्यता

## गोवा किनारी व्यवस्थापन प्राधिकरणाची मंजुरी

वृत्तसंस्था

**पणजी :** राज्यातील सात बांधांच्या दुरुस्तीसाठी ना हरकत प्रमाणपत्र देण्यास गोवा किनारी व्यवस्थापन प्राधिकरणाने मंजुरी दिली आहे. सात बांधांपैकी एक बांध जलस्रोत खाते तर उर्वरित बांध कृषी खाते बांधणार आहे. या दोन्ही खात्यांना अटी घालून बांधांची दुरुस्ती करण्यास मान्यता देण्यात आली आहे. हे सातही बांध खूप जुने असून त्यामुळे खारे पाणी शेतात शिरुन पिकांचे नुकसान होण्याचा धोका निर्माण झाला होता.

जलस्रोत खात्याने पेडणे येथील पराष्टे बांध, तर कृषी संचालनालयाच्या मृदसंधारण विभागाच्या सहाय्यक अभियंत्याने तिसवाडी करमळी येथील कोलवाळ कांतोर बांध, करमळे येथील नागंजो खेडो बांध, कुंडई येथील चिखलपायन खाजन बांध, दिवाडी बेटावरील सांत माथियास भागातील नार्वे बांध, जुने गोवा धावजी एला येथील मांडवी कांतोर बांध आणि तळावली येथील खाजन सांतान हे बांध दुरुस्तीसाठी अर्ज केला होता. पेडणे येथील पराष्टे बांध ८९५ मीटर लांब असून ४ हेक्टर शेतजमीन तसेच नारळ आणि सुपारीच्या बागा यावर अवलंबून आहेत.



**नवी दिल्ली:** पंतप्रधान नरेंद्र मोदी रशियाच्या दोन दिवसांच्या दौऱ्यानंतर दिल्लीला परतले, त्या दरम्यान त्यांनी कझान येथे १६ व्या ब्रिक्स परिषदेला हजेरी लावली. ब्रिक्स परिषदेच्या वेळी त्यांनी चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग, रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन आणि यूएईचे अध्यक्ष शेख मोहम्मद बिन झायेद अल नाह्यान यांच्यासह अनेक जागतिक नेत्यांची भेट घेतली.

# ऐन दिवाळीत ट्रॅव्हल्सच्या दरात तिप्पट वाढ

वृत्तसंस्था

**नवी मुंबई :** दिवाळीच्या सुट्ट्यामध्ये लोकं गावी जाण्यासाठी एसटीने नाही तर रेल्वेने प्रवास करतात. मात्र, दिवाळीच्या तोंडावर आता एसटी आणि रेल्वेच्या गाड्यांचे बुकिंग फुल्ल झाल्यामुळे दिवाळीसाठी गावी निघालेल्या प्रवाशांना खासगी ट्रॅव्हल्स हा एकमेव पर्याय उपलब्ध आहे. मात्र, खासगी ट्रॅव्हल्सने आता तिकिटाचे दर तिप्पटीने वाढवल्याचे समोर आले आहे. त्यामुळे ऐन दिवाळीमध्ये ट्रॅव्हल्सने प्रवास करणाऱ्या प्रवाशांचे दिवाळे निघणार असल्याचे चित्र स्पष्ट दिसत आहे. दिवाळीनिमित्त हंगामी दरवाढीमुळे प्रवाशांना आता आर्थिक फटका बसणार आहे.

## प्रवाशांना आर्थिक फटका

एसटी बस आणि रेल्वेचे तिकिट बुकिंग फुल्ल झाल्यामुळे प्रवाशांना आता खासगी ट्रॅव्हल्स हा पर्याय आहे. मात्र, खासगी ट्रॅव्हल्सकडून दिवाळीच्या अगोदरच तिकिटांच्या दरामध्ये तिप्पटीने वाढ झाल्याचे दिसून येत आहे. तसेच खासगी ट्रॅव्हल्स चालकांना नियमानुसार एसटी बसच्या दीडपट तिकिट घेता येते; मात्र त्यांनी दर प्रमाणाबाहेर वाढविले आहेत.

# विमानतळ सोपविण्यास राजकीय पक्षांचा विरोध

वृत्तसंस्था

**आयझोल :** मिझोरममधील लेंगपुई विमानतळ भारतीय वायुदलाला सोपविण्याच्या योजनेला विरोध आहे. मिझोरममधील मुख्य विरोधी पक्ष मिझो नॅशनल फ्रंटचे (एमएनएफ) अध्यक्ष जोरमथांगा यांनी राज्यातील एकमात्र विमानतळ लेंगपुई वायुदलाला सोपविण्याच्या योजनेला विरोध असल्याचे म्हटले आहे. लेंगपुई विमानतळ राज्याचे अस्तित्व आणि अन्य क्षेत्रांसोबत संपर्काचा स्रोत राहिला आहे.

## मिझोरममध्ये विमानतळावरून वाद

सरकार लेंगपुई विमानतळ भारतीय वायुदल किंवा अन्य यंत्रणांना सोपविण्याचा विचार करत असेल तर एमएनएम अखेरपर्यंत विरोध करणार आहे.

## भारत सरकारने ट्विटरला खडसावले

**नवी दिल्ली :** गेल्या काही दिवसांत विविध विमान कंपन्यांना १०० हून अधिक वेळा बॉम्ब स्फोटांच्या धमक्या आल्या आहेत. याप्रकरणी केंद्रीय इलेक्ट्रॉनिक्स आणि आयटी मंत्रालयाने बुधवारी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सला (ट्विटर) खडसावले आहे. आजवरच्या सर्व धमक्या ट्विटरवरूनच देण्यात आल्या आहेत.

# युद्धाचा युक्रेन आणि रशियाला मोठा फटका

वृत्तसंस्था

**जिनिव्हा :** रशिया आणि युक्रेनमधील युद्धात आतापर्यंत अनेक लोकांचा मृत्यू झाला आहे. त्याच वेळी, संयुक्त राष्ट्रांनी सांगितले की, रशियाच्या आक्रमणानंतर, निर्वासितांचे निर्वासन, घटलेली प्रजनन क्षमता आणि युद्धातील मृत्यू यामुळे युक्रेनची लोकसंख्या एक कोटी किंवा सुमारे एक चतुर्थांश कमी झाली आहे. जिनिव्हा येथे एका पत्रकार परिषदेत बोलताना, यूएन पॉप्युलेशन फंडचे पूर्व युरोप प्रमुख फ्लोरेन्स बाऊर म्हणाले की, फेब्रुवारी २०२२ मधील आक्रमणामुळे आधीच कठीण लोकसंख्याशास्त्रीय परिस्थिती अधिक गंभीर झाली आहे. बाउर म्हणाले की युक्रेनच्या जन्मदरात कमालीची घट झाली आहे आणि सध्या प्रत्येक स्त्रीमागे सुमारे एक मूल आहे, जे जगातील सर्वात कमी मुलांपैकी एक आहे, असे ते म्हणाले. स्थिर लोकसंख्या राखण्यासाठी प्रति स्त्री २.१ मुलांचा प्रजनन दर आवश्यक आहे. १९९१ मध्ये सोव्हिएत युनियनच्या पतनाच्या वेळी युक्रेनची लोकसंख्या ५० दशलक्षाहून अधिक होती.

## स्थलांतर, युद्ध, प्रजनन क्षमता कमी

१४० दशलक्ष पेक्षा जास्त युद्धपूर्व लोकसंख्या असलेल्या रशियाची लोकसंख्याशास्त्रीय परिस्थितीदेखील युक्रेनच्या आक्रमणानंतर बिघडली आहे. या वर्षाच्या पहिल्या सहा महिन्यांत जन्मदर १९९९ पासून सर्वात कमी नोंदवला गेला आहे. क्रेमलिननेदेखील याचे विनाशकारी म्हणून वर्णन केले आहे.

## दोन्ही देशाची लोकसंख्या घटली



लोकसंख्येवर युद्धाच्या परिणामाची अचूक माहिती संघर्ष संपेपर्यंत उपलब्ध होणार नाही.

संगोपन

# दुभत्या जनावरांची घ्यावयाची निगा व जोपासना

**दुधाळ जनावरांचे जन्मापासून योग्य व्यवस्थापन केल्यास वयात आल्यावर त्या गायी / म्हशी भरपूर दुध देतात. वासरांचे संगोपण, रोगांपासून निवारण, कालवडीची निगा व जोपासणा इत्यादी बाबींची योग्य व्यवस्थापन केल्यास कालवडी लवकर माजावर येवून लवकर दुध देतात. संकरीत कालवडी योग्य पालनपोषण केल्यास जन्मापासून अडीच वर्षात वितात. त्यामुळे गोपालकांना लवकर दुध उत्पादन मिळते. अनुवंशिकता, कुपोषण व व्यवस्थापनातील त्रूटीमुळे देशी गायी म्हशींच्या कालवडी जन्मानंतर ३.५ ते ४.५ वर्षांनी वितात. एक महिन्यानंतर वासराला सुग्रास, लुसलुसीत हिरवा चारा व कडबा कुट्टी इत्यादी पौश्टीक आहाराची सवय लावल्यास त्याला लागणा-या अन्नाची गरज दुधा ऐवजी काही प्रमाणात आंबवन व चा-यातून भागवून दुधात निम्मी बचत करता येते. हे प्रयोगावरून सिध्द झालेले आहे. तीन महिने पालनपोशण खर्चात ५० टक्के बचत करता येते. वासरांना चारा, आंबवण खाण्याची सवय लावल्यास तीन महिन्यानंतर साध्या पोटाचे संयुक्त पोटात रूपांतर झपाटयाने होते. वासरांची पचन संस्था मोठया जनावरांप्रमाणे कार्य करू लागते. तीन महिने वयानंतर वासरांना षारीरिक वाढीसाठी दुधाची गरज भासत नाही. कालवडींना भरपूर हिरवा चारा १.० ते १.५ किलो आंबवण दिल्यास त्या लवकर वयात येवून लवकर गाभ धरतात व लवकर दुध देण्यास सुरूवात करतात. त्यामुळे जोपसणेवरील खर्चात बचत करता येते. संकरीत कालवडी २००-२२० किलो षारीरिक वजन व १८-२० महिने वयात असतांना प्रथम माजाचे लक्षण दाखवितात. देषी गायी म्हषींच्या कालवडी ३०-४० महिने वयाच्या दरम्यान प्रथम माजाचे लक्षण दाखवितात. माजाची लक्षणे दिसताच कृत्रिम पध्दतीने १६-१८ तासात उच्च प्रतिच्या किंवा सिध्द वळूच्या गोठविलेल्या विर्याने योग्य वेळी भरविल्यास उलटत नाही. तरीही गायी उलटल्यावर १८-२० दिवसांनी परत माजाच्या लक्षणावर बारकाईने लक्ष ठेवून ती भरवणे अत्यंत गरजेचे आहे. त्यामुळे अनुत्पादक जनावरांतील खर्चात बचत करून जनावरांपासून लवकर उत्पादन मिळते.**

माजावर आलेल्या गायीची लक्षणेः गायीच्या नेहमीच्या वागण्यात फरक जाणवतो, ती अस्वस्थ असते व वरचेवर हंबरते, तीची भूक कमी होते. खाण्याकडे लक्ष लागत नाही. दुधाळ असल्यास दुध उत्पादन घटण्याची शक्यता असते. दुस-या जनावरांना चाटते. दुस-या जनावरावर उडते किंवा दुसरे जनावर तिच्यावर उडल्यास स्तब्ध उभी राहते. लघवीचे प्रमाण वाढते. योनीमार्गातून काचेसारखा स्वच्छ व चिकट द्रव्य बाहेर येतो. योनीच्या बाहेरील भागास थोडीशी सुज असल्यासारखे वाटते. योनीमार्गातील आतील मांसल भाग नेहमीपेक्षा जास्त लालसर होतो.

माजाची लक्षणे दिसल्यापासून १०-१२ तासांनी कृत्रिम रेतन पध्दतीने गर्भधारणा करून घ्यावी. सरकारी केंद्रामधून इंजेक्षन देवून गाय भरवण्याची सोय झाली आहे. माजावर आलेल्या गायीच्या उदरात इंजेक्शनद्वारे शुक्रजंतू सोडून भरवतात. गाय भरवल्यानंतर २०-२१ दिवसांनी माजावर न आल्यास ती गाभन असल्याचे खात्री करून घ्यावी. पुष्कळदा गायी माज दाखवत नाही व दुस-या तिस-या महिन्यात माजावर येतात. अशा गायी पशुवैद्यकीय तज्ञाकडून तपासणी करून औशधोपचार करून घेणे बरे म्हणजे भाकड काळ जास्त राहात नाही. शक्यतो गाय व्याल्यानंतर ६०-९० दिवसांच्या आत भरवून घ्यावी. त्यासाठी ४५ दिवसांनी तिच्या माजावर लक्ष ठेवावे. गाय गाभण झाल्यानंतर जर ती दुध देत असेल तर ७ महिन्यापर्यंत दुध काढायला हरकत नाही. मात्र ७ महिन्यानंतर दुध काढणे हळूहळू बंद करावे. त्यामुळे तिच्या कासेची व गर्भाशयातील वासरांची चांगल्याप्रकारे वाढ होते व त्याचा फायदा पुढील वेतात होतो. प्रत्येक गाय १९-२१ दिवसांनी माजावर येते.

**गाभण गायीचे संगोपनः** गाभण गायींना गाभण काळात शेवटच्या दोन ते अडीच महिन्याच्या काळात दीड ते अडीच किलो समतोल खाद्याचा पुरवठा करावा. सातव्या महिन्यानंतर गाभण गायीला पळवू नये. दररोज त्यांना ३-४ तास मोकळे फिरण्याचा व्यायाम द्यावा. जनावर स्वच्छ ठेवावे. गाय विण्याचे वेळी तिच्यावर दुरूनच लक्ष ठेवावे. गाय व्याल्यावर तिची वार पडली आहे याची खात्री करावी. काही अडचणी वाटल्यास पशुवैद्यकाची मदत घ्यावी.

**वासराचे व कालवडीचे संगोपणः** वासरू जन्मल्याबरोबर त्याच्या नाकातील, तोंडातील व कानातील चिकट पदार्थ काढून ते कोरडे व स्वच्छ करावे. वासराचे कोवळे खूर काढावे. नाळ आपोआप तुटली नसल्यास वासराचे बेंबीपासून ५ ते १० सें.मी. अंतरावर आयोडिनमध्ये भिजलेल्या दो-याने घट्ट बांधून त्यापुढील भाग निर्जंतुक केलेल्या कात्रीने कापावा व त्यावर दिवसातून २-३ वेळा आयोडिन लावावे. वासरू जन्मानंतर सुमारे एका तासातच त्याला सर्वसाधारणपणे वासराच्या वजनानुसार १-२ लिटरचिकदुध पाजावा. षिंगे वाढू नयेत म्हणून ७-१० दिवसाच्या आत षास्त्रीय पध्दतीने षिंगाचा भाग नाहीसा करावा. लाळया किंवा लाळखुरी रोग होवू नये म्हणून त्यांना वयाच्या तिस-या व सहाव्या महिन्यात या रोगाची लस टोचून घ्यावी.

**दुधाळ जनावरांचे खाद्य आणि खुराकः**

दुभत्या जनावरांना देण्यात येणारा खुराक, त्याचे वय, लिंग, जात, कार्यक्षमता व दुध उत्पादन यावर अवलंबून असतो. सर्वसाधारण नियमाप्रमाणे दुभत्या जनावरांना त्यांच्या षरीराच्या वजनाच्या दोन ते साडेतीन टक्के शुष्क खाद्य देणे जरूरीचे असते. त्यापैकी २/३ भाग वैरण व १/३ भाग आंबवण देणे हितावह ठरते. ज्या संतुलित आहारामुळे गाय किंवा म्हैस तिला दिलेल्या खाद्यांचे रूपांतर जास्तीत जास्त दुध घटकामध्ये करू शकेल तो आहार किफायतषिर मानावा लागेल. आंबोण तयार करण्यासाठी घटक निवडतांना त्याची स्थानिक उपलब्धता, किंमत, पचनियता व परिवर्तन क्षमता या गोष्टी प्रामुख्याने लक्षात घ्यावयास हव्या. षेतक-यांनी किंवा दुध उत्पादकांनी षक्यतो त्यांच्या स्वतःच्या षेतातील पिकांपासून प्राप्त होणा-या खाद्य घटकांचाच प्रामुख्याने वापर करावा. यामध्ये धान्याचा भरडा, सरकी, भुईमूग, तीळ, मोहरी, जवस इयादी पेंड, धान्याची टरफले व पिकांपासून मिळणारा कोंडा किंवा भूसा, हरभरा, तूर, मूग, उडीद, मसूर यापासून मिळणारी चुणी यांचा समावेष होतो. यांचा वापर करून जनावरांना आंबोण म्हणून द्यावे. व्यावसायिकदृश्टया दुधाचे उत्पादन करण्यासाठी जनावरांना १४ ते १६ टक्के प्रथिने व ६५ ते ६८ टक्के एकूण पचनिय अन्नघटक असलेले खाद्यमिश्रण ४-५ तास आधी भिजवून आंबोण म्हणून द्यावे.



समतोल खाद्यमिश्रण तयार करतांना सर्वसाधारणः पेंड २५-३० टक्के, चुणी १५-२० टक्के, धान्याचा भरडा २५-३५ टक्के, कोंडा, भूसा, टरफले १०-२० टक्के असे प्रमाण असावे. शिवाय त्यामध्ये खनीज १ टक्का व मिठ १-२ टक्के वापरावे. रवंथ करणा-या दुभत्या जनावरांचे जठर चार भागात विभागलेले असल्यामुळे ते मोठे असल्यामुळे त्यांना तंतुमय घटकांनी युक्त आहार दिला नाही तर त्यांचे पोट भरत नाही. म्हणून वैरण देणे अत्यावश्यक आहे.

१.ओली वैरण - दुभत्या जनावरांना दररोज १५-२५ किलो हिरवी वैरण यंत्रावर बारीक तुकडे करून नंतरच द्यावी. यामध्ये गवत वर्गातील पॅरा, गिनी, नेपिअर, मारवेल, अंजन, इत्यादीचा समावेश होतो. तसेच एकदल वर्गातील ज्वारी, बाजरी, मका, ओट, बार्ली तसेच द्विदल वर्गातील चवळी, बरसीम, लसुवघास, दषरथ, सोयाबीन, इत्यादींचा समावेष होतो. हिरव्या वैरणी प्रमाणेच मुरघास देणे हितावह असते. मुरघास म्हणजे गवत किंवा द्विदल / एकदल वैरणीपासून विषिश्ट प्रक्रिया करून मुरवलेली वैरण होय. ही वैरण म्हणजेच मुरघास विषेशतः उन्हाळयात जेव्हा हिरवी वैरण फार कमी मिळते तेव्हा वापरावे.

२.सुकी वैरणः यामध्ये ज्वारी, बाजरी यांचा कडबा, भात, गहू यांचा पेंढा, द्विदल वर्गातील वाढलेली वैरण यांचे मिश्रण ४-८ किलो प्रमाणात द्यावे. जनावरांची वैरण सुरक्षित जागी साठवून आवष्यकते प्रमाणे वापरावी. गायीची दुध उत्पादनक्षमता तसेच उत्कृष्ट गाईची निवड करतांना घ्यावयाची काळजी

गायीची दुध उत्पादनक्षमता ही सभोवतालचे वातावरण, गायीचा आहार व तिचे संगोपण या गोश्टीवर अवलंबून आहे. त्याचप्रमाणे दुध उत्पादनक्षमता ही पुढील गोश्टींवर अवलंबून असते.

१.पैदास -देशी गायीपेक्षा संकरीत गायी लवकर वयात येतात व दुध उत्पादनास लवकर प्रारंभ होतो. या गायी एका वेतास सरासरी १९०० लिटरहून अधिक दुध देतात त्यात १/४ रक्त पाश्चात्य असणा-या गायी २००० लिटर आणि १/२ रक्त पाष्चात्य असणा-या गायी २२५० लिटर तर ५/८ रक्त पाश्चात्य असणा-या गायी २७५० लिटर दुध देतात. संकरीत गायी नियमितपणे प्रजोत्पादन करतात. वरील सर्वांचा परिणाम दुध उत्पादकतेवर होतो.

२.आहार - गायीच्या खाण्यामध्ये खुराक हिरवा चारा, सुका चारा म्हणजेच वैरण, पाणी, इत्यादी बाबी जर योग्य प्रमाणात जनावरांना दिल्या तरच उत्पादनक्षमता वाढते. त्याचे प्रमाण कमी जास्त झालेतर दुध उत्पादनक्षमतेवर परिणाम होतो.

३.संगोपण व संवर्धन- वासरांच्या जन्मापासून ते त्याच्या गायीत किंवा बैलात रूपांतर होईपर्यंत संगोपणाची गरज असते. त्यांचे ऊन व पावसापासून संरक्षण करावे. जनावरांना स्वच्छ सुर्यप्रकाष व स्वच्छ हवामानात वाढवावे. तसेच त्यांना चरण्यासाठी उपलब्ध कुरणात सोडावे. त्यामुळे त्यांचे पाय मोकळे होतील. तसेच वासरासाठी पिण्याचे शुध्द पाणी, गरजेनुसार हिरवा चारा व षुध्द हवामान हे त्यांच्या वाढीस चांगले पोशक ठरते.

४.रोगप्रतिबंधक उपाय -जनावरांना रोगापासून वाचविण्यासाठी रोगप्रतिबंधक लसी टोचून घेणे त्यांच्या भविश्यातील आरोग्यासाठी लाभदायक असते.

**उत्कृष्ट गायीची लक्षणे तसेच निवडः**

१.गायीचे वय तीन ते चार वर्शाच्या दरम्यान असावे.
२.गाय शक्यतो पहिल्या किंवा दुस-या वेताची असावी.
३.तिचे डोळे रेखीव आणि पाणीदार असावेत.
४.गायीची त्वचा मऊ व तजेलदार असावी.
५.गायीच्या मानेवर किंवा तिच्या षरीराच्या अन्य कोणत्याही भागावर अनाठायी चरबी नसावी.
६.गायीची छाती रूंद आणि भरदार असावी.
७.गायीच्या पुढच्या दोन पायामध्ये छातीजवळच्या भागात योग्य व पुरेसे अंतर असावे. ८.गायीच्या बरगडया रूंद, बाकदार आणि अर्धगोलाकार असाव्यात. दुधाळ गाय असेल तर तिच्या षेवटच्या तीन बरगडया दिसून येतात.
९.गायीची पाठ डोक्यांपासून ते षेपटाच्या वरच्या टोकापर्यंत लांब आणि सरळ असावी.
१०.तिचा पार्श्व भाग हा त्रिकोणाकृती असावा.
११.गायीच्या मागील दोन पायामध्ये तिची कास सामावून घेण्यासाठी पुरेसे अंतर असावे.
१२.गायीच्या पायांचे खूर समतोल आणि रूंद असावेत.
१३.गायीची कास मोठी असावी ती गायीच्या पोटास घट्ट चिकटलेली असावी. कासेचे चारही सड समान आकाराचे आणि योग्य अंतरावर विभागलेले असावेत. कास मऊ व प्रमाणषिर असावी. ती लोंबकळणारी व अप्रमाणषिर असू नये. अशी कास धार काढण्याच्या दृष्टिने अयोग्य आणि अडथळा निर्माण करणारी असते. षिवाय अशाप्रकारच्या कासेला स्तनदाह होण्याचा धोका असतो.
१४.गायीची दुग्धशिर मोठी, नागमोडी वळणाची आणि ठसठषीत आकाराची असावी. १५.शक्य असेल तर गायीची पक्की निवड करण्यापूर्वी तिची धार काढून दुध मोजून पाहावे.
१६.गायीला धार काढण्याच्या वेळी काही खास खोडी वगैरे आहेत किंवा काय, तिची पान्हावण्याची सवय कषी आहे, ती धार काढतांना लाथा झाडणारी किंवा मारकी आहे किंवा काय या सर्व गोष्टींची माहिती गायीच्या मालकाकडून तसेच त्याच्या आजुबाजूच्या व्यक्तिकडून घ्यावी. वरील सर्व गुणांनी युक्त असलेली आदर्श गाय, जास्तीत जास्त लक्षणे ज्या गायीत आढळतील तीची निवड करणे दुध उत्पादक शेतक-यांच्या दृश्टिने निश्चितच फायद्याचे आहे.

## सर्वात जास्त दूध देणारी म्हैस कोणती?

आपल्या देशात मोठ्या प्रमाणावर पशुपालनाचा व्यवसाय केला जातो. शेतीला जोडधंदा असणारा प्रमुख व्यवसाय म्हणून पशुपालनाकडं बघितलं जातं. पशुपालनाच्या माध्यमातून शेतकरी चांगला नफा मिळवू शकतात. मोठ्या प्रमाणात दूध देणाऱ्या गाई-म्हशींच्या नवनवीन जाती आहेत. या जातींचं शेतकरी संगोपन करुन चांगलं उत्पन्न मिळवतायेत. गायीच्या दुधापेक्षा म्हशीच्या दुधाला मोठी मागणी आहे आणि दरही जास्त आहे.

**मुर्रा जास्त दूध देणारी म्हैस**

गाई आणि दुधापेक्षा म्हशीच्या दुधाला जास्त किंमत आहे. याचे कारण म्हणजे म्हशीचे दूध गाईच्या दुधापेक्षा सकस असते. आज आपण जास्त दूध देणाऱ्या म्हशीच्या जातीची माहिती पाहणार आहोत. म्हशीची मुर्रा जात ही जास्त दूध देणारी जात मानली जाते. देशातील मोठ्या संख्येनं पशुपालक मुर्रा म्हशी पाळतात. या म्हशीच्या दुधातून पशुपालकांना चांगला नफा होतो. मुर्रा म्हशीची दूध देण्याची क्षमताही इतर जातींपेक्षा जास्त आहे. मुर्रा म्हशीचा रंग हा काळा असतो. याशिवाय त्याची शिंगे वक्र असतात. हरियाणा, दिल्ली, आणि पंजाबमधील रोहतक, हिसार, जिन्द आणि करनाल या जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात मुर्रा म्हशी आढळतात. तसेच परदेशातही इटली, बल्गेरिया, इजिप्त इत्यादी देशात या म्हशी आढळतात. हरियाणामध्ये मर्रा म्हशीला काला सोना असेही म्हणतात. दुधामध्ये चरबी उत्पादनासाठी मुर्रा ही उत्तम जात आहे. त्याच्या दुधात ७ टक्के चरबी आढळते.

**मुर्रा म्हैस दिवसाला २० ते ३० लिटर दूध देते**

मुर्राह म्हशीचे डोके लहान आणि लांब शेपूट असते. तसेच त्याचा मागील भाग मोठा असतो. या म्हशीच्या डोक्यावर, शेपटीवर आणि पायावरही सोनेरी रंगाचे केस आढळतात. मुर्रा म्हशीचा गर्भधारणा कालावधी हा सुमारे ३१० दिवसांचा असतो. त्याची नीट काळजी घेतल्यास ही म्हैस दररोज २० ते ३० लिटर दूध देते.

**मर्रा म्हशीची किंमत किती ?**

पशुपालकांना मुर्रा म्हशीच्या दुधाला चांगला भाव मिळतो. या म्हशीची किंमत ५० हजार रुपयांपासून ते २ लाख रुपयांपर्यंत आहे. मुर्राह म्हशीची जात तिच्या चकचकीत काळया सौंदर्यासाठी आणि चरबीयुक्त उच्च दूध उत्पादनाच्या फायद्यांसाठी जगभरात प्रसिद्ध आहे. जर मुर्राह म्हशींना चांगले चारा दिला आणि त्यांची काळजी घेतली तर त्या म्हशी २० लिटरपेक्षाही अधिक दूध देऊ शकतात.

# जनावरांचा चारा

जनावरांच्या शरीरातील उर्जा वाढवयण्यासाठी, शरीराची वाढ, तंदुरुस्ती व स्वास्थ्यासाठी खाद्याची गरज असते. म्हणून खाद्यात पुरेशी उर्जा व शरीराला लागणारी प्रथिने,क्षार व आवश्यक असणारी पोषकतत्त्वे यांचा समावेश पाहिजे. तसेच पचनक्रिया सुरळीत ठेवण्यासाठी काही घटकही आहारात असावे लागतात.

**चारा- हिरवा व वाळलेला**

खुराक - यामध्ये कडधान्ये(मका, ज्वारी, बटाटा, टॅपी ओका) व कारखान्यातील उपउत्पादने(मळी, पेंड)

**हिरवा चारा :** हिरव्या चाऱ्यामध्ये पाण्याचा अंश जास्त असतो. हिरवा चारा जनावरांना चिवस्ट लागतात. खुराकामध्ये अन्नघटक व उर्जा जास्त प्रमाणत असल्यामुळे याचा दुधावर चांगला परिणाम होतो. पशुला खाद्य देताना खालील बाबीचा विचार करावा :

खाद्यातील पाण्याचा अंश किती आहे.

पचन होईल अशा खाद्यचा अंशः- चारा : ४०-५५ टक्के, पेंड :८०-९० टक्के ,धान्य :७०-९० टक्के पौष्टिक गुण, आवश्यक असणारी पोषकतत्त्वे पहावे.

चव व स्वाद कि ज्यामुळे जनावरांना खाद्य आवडेल.

विशिष्ट प्रथिने,जीवनसत्त्वे इ. ने त्यांची प्रकृती सुधारेल /आरोग्य राखले जाईल.

**हायड्रोपोनिक्स-** हायड्रोपोनिक्स पद्धतीने बनवलेला हिरवा चारा हा जनावरांसाठी खुपच उपयुक्त असे खाद्य आहे. आधुनिक तंत्रज्ञान व रासायिनक द्रव्यांचा वापर करून पाण्यात तयार केलेले खाद्य जनावरांसाठी जास्त फायदेशीर व किफायतशीर ठरते. या खाद्याद्वारे जनावरांना आवश्यक प्रथिने, जीवनसत्त्वे मिळतात व त्याचा परिणाम दुध उत्पादन वाढीवर होतो. वाळलेल्या सुक्या चाऱ्याचा उपयोग पोषण आहारासाठी होतो. ओला चारा पोषण आहार व उत्पादन आहार दोन्हीसाठी फायद्याचा ठरतो. खुराकामध्ये ऊर्जा भरपूर प्रमाणात असते, म्हणून उत्पादन आहारासाठी याचा वापर होतो. हिरवा चारा जसे घास, हिरवा मका, गवत, उसाचे वाढे इत्यादी या खाद्यामध्ये पाण्याचा अंश जास्त असतो. ही खाद्ये जनावरांना खाण्यासाठी चविष्ट लागतात. तसेच खुराकात म्हणजेच साखर काढल्यानंतरची मळी, तेल काढल्यानंतरची पेंड, भरडा यांमध्ये अन्नघटक (प्रथिने) व ऊर्जा जास्त प्रमाणात असतात. यामुळे दुधाच्या उत्पादनावर चांगला परिणाम होतो व दुधाच्या उत्पादनात वाढ होते. तसेच विशिष्ट प्रथिने, जीवनसत्त्वे असलेल्या खाद्यान्नामुळे जनावरांची प्रकृती सुधारते व स्वास्थ राखले जाते.

**वाळलेला चारा**

डोंगराळ व वनांसाठी आरक्षित जागेमध्ये वाळलेले डोंगरी गवत, भाताचा पेंढा किंवा गव्हाचे काड कापून साठवून ठेवले जातात. काही ठिकाणी कडबा साठवून ठेवला जातो. हे गवत मुखत्वे हिवाळयात व उन्हाळयाच्या



सुरुवातीला वापरण्यात येते. ह्या वाळलेल्या गवतात पोषकतत्त्वे कमी प्रमाणात असतात. अश्या चाऱ्याला युरिया, मिठ, मिनरल मिक्शर, व गुळ याची प्रक्रिया करून त्याचे पोषण मूल्य सुधारले जाऊ शकतात. ज्यामुळे जनावरांना ज्यावेळी हिरवा चार उपलब्ध नसेल अशावेळी पुरेसा पौष्टिक चारा मिळेल व चा-याची कमतरता भासणार नाही.

**सुक्या चा-यावरती प्रक्रिया करण्याची गरज**

सुक्या चाऱ्याला चव नसल्यामुळे जनावरे बराचसा भाग खात नाहीत व तो वाया जातो.

काही चा-यास बारिक धारदार काटे असतात ते जनावरांना खाताना तोंडाला कापतात व तोंडातील सुक्ष्म भागांना जखमा होतात.

पावसाळा संपल्यानंतर जनावराना हिरव्या चाऱ्याची कमतरता भासते,अश्यावेळी सुक्या चा-यावरती अवलंबुन रहावे लागते.परंतु या चा-यामध्ये जनावरांसाठी आवश्यक पोषकतत्त्वे, प्रथिने, जीवनसत्त्वे पाहीजे त्याप्रमाणात मिळत नाहीत.

**खुराक :** खुराकामध्ये ऊर्जा भरपूर प्रमाणात असते, म्हणून उत्पादन आहारासाठी याचा वापर होतो. हिरवा चारा जसे घास, हिरवी मका, गवत, उसाचे वाढे या खाद्यामध्ये पाण्याचा अंश जास्त असतो ही खाद्ये जनावरांना खाण्यासाठी चिवस्ट लागतात.तसेच खुराकात म्हणजेच साखर काढल्यानंतरची मळी, तेल काढल्यानंतरची पेंड,भरडा यांमध्ये अन्नघटक (प्रथिने) व ऊर्जा जास्त प्रमाणात असतात, यामुळे दुधाच्या उत्पादनावर चांगला परिणाम होतो व दुधाच्या उत्पादनत वाढ होते. तसेच विशिष्ट प्रथिने,जीवनसत्त्वे असलेल्या खाद्यान्नामुळे जनावरांची प्रकृती सुधारते व स्वास्थ राखले जाते. जनावरांना चाऱ्याची गरज दोन कारणासाठी असते .शारीरिक वाढीसाठी आणि उत्पादनासाठी किंवा कार्यशात्तीसाठी. जनावरांना आपण जो चारा देतो त्या सर्वाचेच पचन होते असे नाही त्यामध्ये असणाऱ्या घटकांनुसार व प्रकारानुसार पचनयोग्य घटक वेगवेगळे असतात.

**खाद्य व्यवस्थापन**

जनावरांना शरीरपोषणासाठी व दुग्धोउपादनासाठी खाद्याची गरज असते. ज्या आहारातून शरीरपोषणासाठी व दुग्धोउपादनासाठी आवश्यक अन्नद्रव्ये पाचक स्वरूपात मिळतात व भूक भागते त्या आहारास'समतोल आहार' असे म्हणतात. सर्वसाधारणपणे १० लिटर दुध देणाऱ्या गाई/ म्हशीस(वजन अंदाजे ४०० किलो) ६-८ किलो वाळलेला चारा,२५ किलो हिरवा चारा व ५-६ किलो खुराक खाद्य आवश्यक असते. वाळलेला चारा व हिरव्या चाऱ्याची कुट्टी केल्यास २५ टक्के खाद्याची बचत होते. सर्वसाधारण जनावरांना त्यांच्या वजनाच्या २ ते २.५ टक्के वाळलेला चारा लागतो.वाळलेला चारा नसेल तर वजनाच्या ४ ते ६ टक्के हिरवा चारा लागतो. म्हणजे साधरण पूर्ण वाढलेल्या जनावराला ८ ते १० किलो वाळलेला चारा व २० ते ३० किलो हिरवा चारा लागतो.

**फायदे**

पशुखाघ वापरल्याने जनावराच्या स्वास्थ्यामध्ये जलद सुधारणा दिसून येते.

पशुखाद्यामधून योग्य व आवश्यक प्रमाणात जनावरांना शरीरासाठी व दुध उत्पादनासाठी प्रथिने देता येतात.

जनावराची रोगप्रतिकार शक्ती वाढते.

जनावराची प्रजनन क्षमता मजबूत होवून प्रजनन काळात त्याचे स्वास्थ उत्तम राखले जाते.

जनावरांपासून मिळणा-या उत्पादनाची गुणवत्ता सुधारते. उदा : दुधाचे उत्पादन वाढते, वासरे सुदृढ होतात

# बैल प्राण्याची संपूर्ण माहिती

भारत हा कृषिप्रधान देश आहे येथे बैलांचा वापर शेती करता पूर्वी केल्या जायचा. बैल हा शेतकऱ्यांचा मित्र आहे. आता मात्र शेती मशागतीसाठी वेगवेगळी यंत्र आली आहेत. बैल पाळणे सुद्धा लोकांना कठीण काम वाटते. परंतु पूर्वीच्या काळी प्रत्येक घरामध्ये बैलगाडी असायची त्यावर बसून शेतामध्ये जायचे, शेतातील कामे बैलांच्या मार्फत होत होते. पूर्वी बैलांचा वापर शेतामध्ये नांगर करण्यासाठी व शेतातील निघालेले पीक घरी नेण्यासाठी किंवा अवघळ काम करण्यासाठी केला जायचा. आता सुद्धा ग्रामीण भागामध्ये ही कामे होताना आपल्याला दिसतात. परंतु बैलांच्या संख्येमध्ये आता खूप मोठ्या प्रमाणात घट झाली आहे.

बैल हा मानवी जीवनाशी अत्यंत निगडित व उपयोगी असा पशु आहे. बैल हा प्राणी शाकाहारी आहे. बैलांच्या शर्यती सुद्धा लावल्या जातात. बैल घोड्यांसारखा धावू शकतो. त्यासाठी बैलांना आधी प्रशिक्षण द्यावे लागते. शर्यतीमध्ये उतरण्यासाठी खिल्लारी या प्रजातींचे बैल अत्यंत महत्त्वाचे आहे.

हिंदू धर्मामध्ये बैल या प्राण्याला पूजले जाते. कारण बैल हा श्री कैलास पती महादेव यांचे वाहन आहे. त्यामुळे बैल नंदी स्वरूप आहे असे सुद्धा मानले जाते. बैलांचा सण भारतामध्ये मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. भारतामध्ये दरवर्षी बैलांचा सण पोळा साजरा केला जातो. तर चला मग बैल या प्राण्याविषयी सविस्तर माहिती पाहूया.

**बैल हा प्राणी कोठे राहतो ?**

बैल हा प्राणी सुरुवातिला जंगली अवस्थेत आढळून येत होते त्यानंतर उत्तर पूर्व अमेरिकेमध्ये तसेच युरोप आशिया आणि आफ्रिका खंडामध्ये काळ प्राणी राहत असत. या बैलांचा प्रवास होत होत आता या प्रजाती पृथ्वीवर वेगवेगळया ठिकाणी आहेत. त्यांच्या काही प्रजाती पाळीव आहेत.

परिस्थितीनुसार त्यांच्या आकारमानामध्ये मात्र बदल झालेला आपल्याला दिसतो. बैल हा पाळीव प्राणी असून शेतकरी त्यांना आपल्या गोठ्यामध्ये ठेवतो. बैलांच्या काही प्रजाती अजूनही जंगली अवस्थेत आढळतात. त्या मात्र पाळीव नाहीत जंगलामध्ये बैल हा प्राणी कडपांमध्ये राहतो. ज्याप्रमाणे म्हशी व रेडे यांचा वेगळा कळप असतात. असेच गाई आणि बैलांचे वेगळे कळप जंगलांमध्ये असतात.

बैलाचे वर्णन : भारत हा देश कृषीप्रधान देश असल्यामुळे बैल हा प्राणी सर्वांच्या परिचयाचा आहेत. तरीसुद्धा बैलाला चार पाय दोन शिंगे एक नाक, तोंड, लांबलचक शेपूट असतं. बैलाच्या शेपटीचा गोंडा हा काळया रंगाचा असून त्यांची केस जाड असतात. तसंच बैलाला उंच खांदा असतो.

बैलाच्या माने खालचा भाग लोंबतो, त्याला पोळी म्हटले जाते. बैल शरीराने धष्टपुष्ट असतो. बैलांची डोळे टपोरे असतात बैलांना अंधारात सुद्धा चांगलं दिसतं. बैल या प्राण्याचा रंग काळा, लाल, पांढरा व तपकिरी असू शकतो.



**बैल काय खातो ?** बैल हा प्राणी शाकाहारी प्राणी आहे. त्यामुळे तो मक्याची, ज्वारीचा कळबा, कुट्टी शेतातील हिरवा चारा ढेप, खातो. त्या व्यतिरिक्त बैलाच्या शरीरामध्ये ताकद निर्माण होण्यासाठी त्याला धान्याचे दान मानले जाते.

बैल प्राण्याचे जीवन :

बैल या प्राण्याची जीवन खूपच मेहनतीचे आहे. कारण या प्राण्यांना आयुष्यभर शेतीशी निगडित असे काम करावी लागतात. बैल नेहमीच त्याच्या कष्टासाठी प्रसिद्ध असतो. परंतु बैलांचा मालक सुद्धा बैलांना तेवढाच जीव लावतो जिव्हाळा लावतो. त्यामुळे शेतकरी आणि बैल यांच्यामध्ये असे एक अतूट नाते निर्माण होते. मुक्या प्राण्यांबद्दल त्यांना प्रेम वाटते त्यामुळे दरवर्षी भारतामध्ये बैलांचा सण पोळा साजरा केला जातो. हा सण विशिष्ट बैलांचा असतो बैलांना वेगवेगळे पदार्थ करून खाऊ घातले जातात. बैलांना आंघोळ घातली जाते तसेच बैलांना छान सजवले जाते. रंगरंगोटी त्यांच्या शरीरावर केली जाते.

वेगवेगळया राज्यांमध्ये वेगवेगळी पद्धत असून बैल पोळा साजरा केला जातो. हा सण श्रावण महिन्यामध्ये येत असतो. त्या दिवशी पिठोरी अमावस्या असते. या दिवशी बैलांचा थाट पाहण्यासारखा असतो. त्यांच्या गळयात फुलांचे हार पायामध्ये चांदीचे तोडे डोक्याला बाशिंग, पाठीवर नक्षीदार झुल टाकली जाते.

गावभर ढोल, ताशे वाजवत, मिरवणूक सुद्धा काढली जाते. या दिवशी बैलांना पुरणपोळीचा नैवेद्य दाखवला जातो. तसेच बैलांच्या सणाच्या दिवशी त्यांना कोणत्याही प्रकारे कष्ट दिले जात नाही. त्यादिवशी पूर्णपणे त्यांना आराम असतो.

खिल्लारी बैल : या बैलांची जात महाराष्ट्रामध्ये आढळून येते या बैलांची शिंगे लांब तसेच यांचा रंग राखाडी किंवा शुभ्र पांढरा असतो. हे बैल सीतापुर, पंढरपूर, औंध, आटपाटी व सोलापूर या महाराष्ट्रातील प्रदेशांमध्ये मिळतात. खिल्लारी बैल हे खूप ताकदवान वेगवान तसेच चपळ असतात. त्यामुळे यांना शर्यतीसाठी सुद्धा प्रशिक्षण दिले जाते.

हल्लीकर बैल : हल्लीकर या प्रजातींची बैल हे कर्नाटक राज्यातील विजयनगर मध्ये आढळून येतात. या बैलांची शिंगे अजून त्यांचा रंग राखाडी असतो. या बैलांचे कपाळ ठणक व पाय सुद्धा मजबूत असतात. या बैलांचा आकार मध्यम असतो.

कृष्णा बैल : कृष्णा बैल या प्रजाती कर्नाटक राज्यामध्ये आढळून येतात. कर्नाटक मधील कृष्णा नदीच्या भागांमध्ये आणि महाराष्ट्राच्या डोंगराळ भागांमध्ये या बैलांच्या प्रजाती दिसतात. या बैलांचा रंग पांढरा असून शरीराने जाडजुळ असून त्यांची शिंगे मध्यम आकाराची असतात. या बैलांचा उपयोग शेतीसाठी केला जातो.

पुलीकुलम : पुलिकुलम या प्रजाती तमिळनाडू मधील मदुराई जिल्ह्यामध्ये आढळून येतात. या बैलांचा रंग गळत राखाडी असतो. या बैलांचा वापर शेतीमध्ये नांगरणी करण्यासाठी केला जातो तसेच ही बैल जास्त वेगवान नसल्यामुळे यांना शर्यतीमध्ये उतरता येत नाही. या बैलांना जलीकट्टू मांडू किंवा किडाई माडु असे दिखे म्हटले जाते.

अमृतमहल : अमृत महल या प्रजातीचे बैल आकाराने मोठे असून त्यांचा चेहरा आखूड परंतु त्यांचे गाल मात्र फुगलेले असतात. त्यांच्या माने खालची पोळी लहान असून त्यांचा खांदा मोठा असतो.

या बैलांचा रंग करडा असतो. या बैलांच्या प्रजाती कर्नाटक मध्ये आढळून येतात.

# डीएमच्या संपत्तीत पाच वर्षात दुपट्टीने वाढ!

रणधुमाळी

## शपथपत्रात संपत्तीची माहिती समोर

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी विधानसभा निवडणुकीसाठी राष्ट्रवादीचे उमेदवार धनंजय मुंडे यांनी दाखल केलेल्या शपथपत्रात त्यांच्या संपत्तीची माहिती समोर आली आहे. त्यांची संपत्ती गेल्या पाच वर्षात दुप्पट झाली आहे. २०१९ मध्ये २३ कोटी असलेली संपत्ती २०२४ मध्ये ५३.८० कोटींवर पोहोचली आहे.

महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीचा रणसंग्राम सुरु झाला आहे. राज्यातील सर्वच पक्षांकडून उमेदवारांची घोषणा केली जात आहे. त्यातच राज्याचे लक्ष लागलेल्या परळी विधानसभा मतदारसंघातून राष्ट्रवादी अजित पवार गटाकडून धनंजय मुंडे यांना उमेदवारी देण्यात आली आहे. धनंजय मुंडे यांनी काल परळी विधानसभा मतदारसंघातील निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. यावेळी निवडणूक आयोगाकडे सादर केलेल्या शपथपत्रात त्यांची एकूण संपत्ती किती याबद्दलची माहिती उघड झाली आहे.धनंजय मुंडे यांनी गुरुवारी (२४ ऑक्टोबर) परळी विधानसभा मतदारसंघासाठी उमेदवारी अर्ज दाखल केला. या दरम्यान दाखल



केलेल्या शपथपत्रात संपत्तीची माहिती नमूद करण्यात आली आहे. यानुसार धनंजय मुंडे यांच्या संपत्तीत गेल्या पाच वर्षांमध्ये दुप्पटीने वाढ झाली आहे. निवडणूक आयोगाकडे सादर करण्यात आलेल्या शपथपत्रातून ही माहिती समोर आली आहे.

### पाच वर्षांमध्ये संपत्तीत वाढ

धनंजय मुंडेंकडे २०१९ मध्ये २३ कोटींची संपत्ती होती. २०२४ मध्ये सादर करण्यात आलेल्या शपथपत्रात धनंजय मुंडेंकडे ५३.८० कोटींची संपत्ती असल्याचे नमूद करण्यात आले आहे. गेल्या पाच वर्षांमध्ये धनंजय मुंडेंच्या संपत्तीत सुमारे ३१ कोटी रुपयांनी वाढली आहे. धनंजय मुंडे यांची पत्नी आणि कुटुंबाकडे ५३ कोटी ८० लाखांची संपत्ती आहे.

### १५ कोटींची वाहने

गेल्या पाच वर्षात यामध्येही दुपटीने म्हणजे ३०.७५ कोटी रुपयांची वाढ झाली आहे. २०१९ मध्ये त्यांच्याकडे २३ कोटींची संपत्ती होती. धनंजय मुंडे यांच्याकडे १५ कोटींची वाहने आहेत. तर दीड किलो चांदी आहे. त्यांच्या नावे १५ कोटी ५५ लाख ५ हजार १०५ रुपयांची विविध वाहने आहेत. टँकर पासून ते बुलेटपर्यंतच्या सात वाहनांचा यात समावेश आहे. तसेच सात लाख तीन हजार रुपयांचे १९० ग्रॅम सोने आहे. तर पत्नीच्या नावे ३१ लाख ७८ हजार ६७५ रुपयांची दोन वाहने आहेत. २२ लाख ९० हजारांचे ६२० ग्रॅम सोने आणि ७२ हजारांची दीड किलो चांदी आहे.

# नाकाबंदी करतांना कॅश जप्त

वेलडन:बीड शहर पोलिसांची कारवाई



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

विधानसभा निवडणूक अनुषंगाने (दि.२५ ) रोजी पोलीस ठाणे बीड शहर हद्दीमध्ये सुभाष रोडला नाकाबंदी करत असताना पोलीस नाकाबंदी पथकाला पाच लाख रुपयांची कॅश मिळून आली आहे. सदरील कॅशी जप्त करण्यात आली असून, उचित कार्यवाही पोलीस करत आहे. अनंत कैलास दहिवाळ यांच्या ताब्यातून ही कॅश मिळाली आहे.

या संदर्भामध्ये तात्काळ ही माहिती आचारसंहिता अनुषंगाने कार्यरत असलेल्या एफएसटी पथकास ही माहिती पुरवण्यात आली आहे.या संदर्भात पुढील कार्यवाही चालू आहे.

सदरील कारवाई, श्री. अविनाश बारगळ, अपर पोलीस अधीक्षक बीड श्री सचिन पांडकर, उपविभागीय पोलिस अधिकारी श्री. विश्वांबर गोल्डे, बीड आणि पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ यांचे मार्गदर्शनाखाली सपोनी बाबा राठोड परि. पोउपनि रियाज शेख पोना जयसिंग वायकर पोअं मनोज परजने पोअं अशपाक सय्यद करण्यात आली आहे.

# दोन दिवसात निर्णय घ्या,नाहीतर महायुतीच्या प्रचारावर बहिष्कार!

जागा वाटपात अन्याय: रिपाइंने ठणकाहून दिला महायुतीला इशारा



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

महायुती मध्यें जागावाटपात रिपब्लिकन पक्षावर अन्याय होत असल्याने नाराज रिपब्लिकन कार्यकर्त्यांनी आज महायुती विरुद्ध एल्गार पुकारता जोरदार घोषणाबाजी केली.जागावाटपात सन्मानजनक तोडगा काढला जात नाही , रिपब्लिकन पक्षाला सन्मान जनक जागावाटप दिले जात नाही तोपर्यंत रिपब्लिकन कार्यकर्त्यांचा महायुतीच्या प्रचारावर बहिष्कार करण्याचा आज रिपब्लिकन कार्यकर्त्यांनी निर्णय घेतला. दोन दिवस वाट बघून महायुती की. महाविकास आघाडी कुणाचा प्रचार करायचा याचा रिपब्लिकन पक्ष निर्णय घेईल याबाबत अंतिम निर्णय रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष ना.रामदास आठवले घेतील तो आम्हाला पान २ वर...

# कार्यकर्तुत्वाला मिळाली पदाची संधी

निवड: युवा सेना जिल्हाप्रमुखपदी सुजित शिंदे

नेकनूर/पुण्यभूमी प्रतिनिधी



मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब संसदरत्न खासदार डॉ श्रीकांत शिंदे साहेब यांच्या आदेशाने युवासेना कार्याध्यक्ष पूर्वे शजी सरनाईक यांनी युवासेनेचे बीड जिल्ह्यातील परळी, केज, अंबाजोगाई विभागाचे पदाधिकारी जाहिर केले असून परळी, केज विधानसभेसाठी युवा सेना जिल्हाप्रमुखपदी सुजित रामदास शिंदे यांची निवड करण्यात आली. युवासेनेचे राज्य कार्याध्यक्ष पूर्वेश सरनाईक यांनी ही निवड केली. शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक अनिल दादा जगताप व मराठवाडा निरीक्षक विपुल पिंगळे यांनी सर्व नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांना शुभेच्छा दिल्या. यामध्ये परळी, केज विधानसभेसाठी युवा सेना जिल्हाप्रमुखपदी सुजित रामदास शिंदे, उपजिल्हाप्रमुखपदी वैभव जाधव (बीड शहर विभाग), पान २ वर...

# संधी साधून चोरायचे जनावरे

कारवाई:पोलिसांनी पाठलाग करुन आवळल्या मुसक्या

लोणार/पुण्यभूमी प्रतिनिधी

पोलीस स्टेशन बीबी हद्दीत एक बोलेरो पिक अप वाहन संशयित रित्या आढळून आल्याने सदर वाहनाचा पाठलाग बिबी पोलीस स्टेशनचे ठाणेदार संदीप पाटील परमेश्वर शिंदे ना पोको अरुण सानप भारत ढाकणे यांनी पाठलाग केला असता सदर वाहन हे दुसर बीड येथील समृद्धी महामार्गावर गेल्याने सदर वाहनाचा पाठलाग छत्रपती संभाजी नगर पर्यंत केला छत्रपती संभाजीनगर येथे सावंगी नाका भागात पिकप वाहन हे पोलिसांची नजर चुकवून पसार झाले त्यानंतर छत्रपती संभाजी नगर येथे स्थानिक पोलिसांना माहिती देऊन पोलीस स्टेशन बिबी च्या पथकाने कसुन तपास करून छत्रपती संभाजीनगर



येथील हर्सूल सावंगी नाका गणोरी भागात बोलोरो पिकप वाहन व आरोपी चोरून नेलेली जनावरे यांचा शोध घेत असताना जनावर चोरी करणाऱ्या टोळीचा मोरक्या पोलिसांना मिळून आला त्याला ताब्यात घेऊन विचारपूस करून पोलीस स्टेशन बिबी हद्दीतील किनगाव जट्टू येथील चोरून नेलेली ५ जनावरे हरसुल भागातून आरोपीच्या कब्जातून पंचा समक्ष जप्त करून मालकांच्या ताब्यात देण्यात आली मुख्य आरोपी शेख रहीम शेख समृद्दीन वय वर्ष ३२ रा हर्सूल ग्रीन पार्क सोसायटी यास अटक केली नमूद आरोपी यास पोलीस कोठडी दरम्यान गुन्ह्या संबंधाने पान २ वर...

# बीडच्या मैदानात पँथर उतरला!

पडघम: जिल्हाध्यक्ष नितीन सोनवणेंचा अर्ज दाखल



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

बीडचे राजकीय मैदान गाजवण्यासाठी नितीन सोनवणे रुपी आक्रमक पँथर उतरला आहे ऑल इंडिया पँथर सेनेचे जिल्हाध्यक्ष नितीन सोनवणे यांचा आज बीड विधानसभेसाठी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला जनसामान्यांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी २४ तास उपलब्ध राहणारा युवा नेता म्हणून नितीन सोनवणे यांची जिल्ह्याला ओळख आहे समाजातील सर्व जाती धर्मामध्ये सोनवणे यांचा मोठा मित्र परिवार आहे सोनवणे यांच्या उमेदवारीने बीड विधानसभा क्षेत्रातील जनतेसमोर एक चांगला उमेदवार निवडून योग्य पर्याय निर्माण झाला आहे नितीन सोनवणे यांनी शुक्रवार दिनांक २५ रोजी बीड विधानसभा निवडणुकीसाठी आपला अपक्ष उमेदवारी अर्ज सर्व महापुरुषांना अभिवादन करून दाखल केला या प्रसंगी कावेरी जाधव, सूर्यकांत ठोकळ, दीक्षा मीर पगार, कोमल तुरुकमारे, पापाभाई, निसार शेख, सुंदर वाघमारे,रोशन धिवार,प्रशांत पायाळ, सय्यद आतार, उमेश पारिक आकाश शिंदे, व शेकडो कार्यकर्ते पदाधिकारी व समाज बांधवांना च्या उपस्थितीमध्ये अर्ज दाखल केला.

# माजलगावचे वातवरण तापणार!

रणसंग्राम:माधव निर्मळांचा उमेदवारी अर्ज दाखल



माजलगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

माजलगाव विधानसभा मतदारसंघात महायुतीकडून विद्यमान आमदार प्रकाश सोळंके यांची उमेदवारी जाहीर होतात माधव निर्मळ यांनी आपल्या राष्ट्रवादी काँग्रेस पदाच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांच्याकडे सुपूर्त केला आहे .

दरम्यान त्यांनी दिनांक २४ रोजी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला असून यावेळी बोलताना ते म्हणाले की मी अपक्ष म्हणून निवडणूक लढवत आहे आणि मतदारांच्या आशीर्वादाने ही निवडणूक मी जिंकणार आहे . माजलगाव मतदार संघाच्या सर्वांगीण विकासासाठी माझे प्रयत्न असणार आहेत . माजलगाव, वडवणी , धारूर या तिन्ही तालुक्यात मी दौरे केले असून जनतेचा मला प्रचंड प्रतिसाद आहे त्यामुळे मी ही निवडणूक लढवण्याची इच्छा पक्षाकडे व्यक्त केली होती आणि पक्षाकडे तिकिटाची मागणी केली परंतु पक्षाने माझ्या उमेदवारी ला मंजुरी दिली नाही आणि त्यांनी विद्यमान आमदारांना पुन्हा एकदा उमेदवारी दिली यामुळे मी पक्षाला सोड चिठ्ठी दिली आहे . जनता माझ्या पाठीमागे असून जनतेच्या आग्रहास्तव आणि कार्यकर्त्यांच्या आग्रहास्तव पान २ वर...

# पंचशील नगरमध्ये धम्मदेसना

ॲड.तेजस वडमारे: उपस्थित राहण्याचे आवाहन

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

दिनांक २७/१०/२४ रोजी त्रिरत्न बुध्द विहार, पंचशील नगर बीड येथे बुध्द आणि त्यांचा धम्म ग्रंथाचे सांगता समारोप कार्यक्रम आयोजीत करण्यात आला आहे या कार्यक्रमासाठी प्रमुख धम्मदेसणा पुज्ञ भंते शिवली अंगुलिमाल शाक्यपुत्र महास्थविर व पूज्ञ भंते मिलिंद बोधी थेरो हे देणार आहेत,

या कार्यक्रमा सकाळी ०८:०० वाजता भंते यांच्या हस्ते पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण होणार आहे त्यांनंतर बौद्ध उपासक उपसीका बालक बालिका यांच्या उपस्थितीत पांढरे शुभ्र वस्त्र परिधान करून भव्य धम्म रॅली त्रिरत्न बुध्द विहार ते जुना धनोरा रोड, श्रवस्ती बुध्द विहार, पलवन रोड, कृषी कॉलनी चौक पर्यंत पाई रॅली निघुन त्रीरत्न बुध्द विहार येथे संपन्न होइल, त्यांनंतर पुज्ञ भंते यांना भोजन दान होईल दुपारी १२: ०० वाजता पूज्ञ भंते यांची धम्मदेसनेला सूर्वात होइल त्यांनंतर बीड येथे ज्या विहारात बुध्द आणि त्यांचा धम्म ग्रंथ वाचन आषाढ पौर्णिमा ते अश्विन पौर्णिमा



पर्यंत वाचन केले आहे त्याच्या कमिटी चे भारतीय बौद्ध महासभा बीड शहर शाखेचे वतीने प्रमाणपत्र व सन्मान चिन्ह पुज्ञ भंते यांच्या हस्ते देऊन सन्मान करण्यात येणार आहे, तसेच भारतीय बौद्ध महासभा शाखा बीड शहर च्या वतीने दुसऱ्या शाखेचे उद्घाटन ॲड केतन गायकवाड पान २ वर...

प्राजक्त तनपुरे

## पाठिंबा बैठकीत एकमुखी निर्णय

# विश्वासाला तडा जाऊ देणार नाही

राहुरी/पुण्यभूमी प्रतिनिधी धनराज जरी तिकडे भाजपात गेला असला तरी शेतकरी मंडळाचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते हयानी माझ्या सोबत राहण्याचा निर्णय घेतला आहे त्यांचा विश्वासाला कदापीही तडा जाऊ देणार नसल्याचे प्रतिपादन आ प्राजक्त दादा तनपुरे यांनी केले.

धनंजय गाडे यांनी घेतलेला निर्णय हा एकतर्फी निर्णय असून स्वर्गीय शिवाजीराजे गाडे यांचे व शेतकरी मंडळाचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते हे आगामी विधानसभेला आ प्राजक्त दादा तनपुरे यांच्या पाठी मागे खंबीरपणे उभे राहणार असून त्यांना पाठिंबा देण्याचा एकमुखी निर्णय बैठकीत घेण्यात आला.

स्व शिवाजीराजे गाडे यांनी निर्णय



घेतला होता की या पुढे शेतकरी मंडळ हे प्राजक्त तनपुरे यांनाच साथ देणार आहे दुर्दैवाने आज शिवाजीराजे आपल्यात आज नाहीत स्व शिवाजीराजे गाडे यांनी जगाचा निरोप घेताना तनपुरे यांना साथ द्या हा शब्द टाकला होता त्याच शब्दाला जागुन आज ही शेतकरी मंडळ हे प्राजक्त दादा तनपुरे यांना पान २ वर...

### धनराज गाडेनी पुनर्विचार करावा

दोन दिवसांपूर्वी स्व शिवाजीराजे गाडे यांचे चिरंजीव जिल्हा परिषद सदस्य धनराज गाडे यांनी भाजप मध्ये प्रवेश केला होता त्या अनुषंगाने शेतकरी मंडळाचे अनेक पदाधिकारी यांनी बैठकीत नाराजी व्यक्त केली अनेक पदाधिकारी यांनी त्यांच्या निर्णयाचा पुनर्विचार करण्याची ही मागणी केली

# रिपाइं महायुती विरोधात काम करणार

रेश्माताई जोगदंड :पप्पु कागदेंना डावलने महागात पडणार

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या मागे बीड जिल्ह्यातील आंबेडकरी जनता खंबीरपणे उभी आहे. महायुतीकडून केज राखीव मतदारसंघात उमेदवारी देण्याचे संकेत दिले होते. २०१९ मध्ये देखील उमेदवारी देण्याचे निश्चित झाले होते परंतु शेवटच्या क्षणात उमेदवारी नाकारल्याने आंबेडकरी जनता नाराज झाली होती. आता २०२४ ला देखील जाहीर आश्वासन देऊन पप्पू कागदे यांना उमेदवारी न दिल्याने आंबेडकरी जनता रोष व्यक्त करत असून महायुतीचां प्रचार करणार नाहीत, महायुतीच्या उमेदवारांना मतदान करणार नाहीत. आंबेडकरी जनतेतून प्रतिक्रिया येत आहेत.बीड मधील



मेळाव्यात,सभेत यांनी मंत्री,नामदार रामदास आठवले यांनी बीड मधील उमेदवारी जाहिर केली होती. केज मतदान संघात पप्पुजी कागदे यांना जाणीवपूर्वक महायुतीच्या लोकांनी डावलेले आहे, महायुतीला फक्त रिपाइंचे मदत हवी आहेत का? मतदानापुरताच तुम्ही तरी समाजाचा वापर करून घेणार आहात का? आजच्या भीमसैनिकाला आठवली गटाच्या एका नेत्याला आमदार करायचं नाही का?असे महायुतीतील नेत्यांनी ठरवले आहे का?अश्या दलीत समाजात शब्दात महायुतीबदल तीव्र प्रतिक्रिया येत आहेत.बीड जिल्ह्यात रिपाइंचे सर्व कार्यकर्ते नाराज झालेले आहेत. त्यामुळे बीड जिल्हात महायुतीचे उमेदवार असतील तिथे रिपाइं महायुतीचे कोणतेही काम करणार नाही महायुतीच्या विरोधात सर्व कार्यकर्ते काम करणार आहे येणाऱ्या विधानसभा निवडणुक सह सर्वच निवडणुकीत काळात रिपाइंची ताकद दाखवुन दिल्याशिवाय राहणार नाहीत असे रिपाइं महिला आघाडी जिल्हाउपाध्यक्ष रेश्माताई जोगदंड यांनी म्हटले आहे.